**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :०५**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : २७/०१/२०१६

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र- ०५ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका

**शनिवार दिनांक- ३०/०१/२०१६ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ५५ | अहमदनगर महानगरपालिकेचे अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचा-यांना समुह वैयक्तीक अपघात विमापत्रकांतर्गत विमा संरक्षण देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५६ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स या पदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बुरूडगाव रस्त्यावरील कचरा डेपो येथे २०० केव्हीए चा ट्रान्सफार्मर व ५ नग एल.टी.पोल टाकणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| ५८ | अहमदनगर महानगरपालिका सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस बांधकाम साहित्य पुरवठा वार्षिक निविदा दर मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट |
| ५९ | अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत ई - निविदा क्र.९०४ अहमदनगर महानगरपलिका हददीतील औरंगाबाद रोड वरील हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| ६० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये अहमदनगर शहरामध्ये विविध ठिकाणी गॅन्ट्री (दिशादर्शक फलक ) बसविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ६१ | रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी ई - निविदा क्र.१०५३ चे दराबाबत निर्णय घेणेकरीता ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ६२ | अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडिल अ.क्र. १ ते ३० चे जुने निरूपयोगी भंगार साहित्य विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६३ | म.न.पा. शाळा क्र.४ च्या संरक्षण भिंतीच्या आतील  स्टेशन रोड,केडगांव स.नं. १२६ पैकी जागा व्यवसायासाठी जागा भाडे पोटी देणेसाठी दरमहा भाडे व अनामत रक्कम प्रमाणित करून मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६४ | अहमदनगर महानगरपालिकेचे मागासक्षेत्र अनुदान  विकास निधी अंतर्गत सन २०१५-१६ चे लेखाशिर्षामध्ये वाढीव तरतूद करण्बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६५ | महाराष्ट्र राज्य सुवर्ण नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर)राबविणे बाबत घरकुल योजने अंतर्गत संजयनगर व वारूळाचा मारूती परिसर पाणी पुरवठा योजना नालेगांव त घरकुल योजना पर्यत गुरूत्ववाहीनी ,आर.सी.सी.ई.एस.आर.१.५० लाख लि.व १.००लाख लिटर उर्ध्वनलीका,पंपींग मशिनरी इत्यादी कामाची ई - निविदा बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६६ | यश पॅलेस ते चाणक्यचौक रोडवरील,आनंदऋषीजी हॉस्पीटल ते गुगळे बंगला माणिकनगर लगत असणारी रस्त्यापैकी जागा पार्कीग व्यावसायासाठी भाडेतत्वावर मिळणे बाबत. |

सही /-
प्र.नगरसचिव ,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक - ५५ ते ६६ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ५५ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचा-यांना समुह वैयक्तीक अपघात विमापत्रकांतर्गत विमा संरक्षण देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभाग

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभागाकडील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचा विमा वैयक्तिक आपघात विमा पत्रका खाली उतरविणे आवश्यक असल्याने मा.अग्निशमन सल्लागार,महाराष्ट्र शासन मुंबई दि.०२/०६/२०१५ रोजीचे पत्रान्वये व मा.सहा.विमा संचालक विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालयाकडील दि.२४/६/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.त्यावर अग्निशमन विभागाकडून प्रस्ताव सादर करून अग्निशमन विभागाकडील अधिकारी /कर्मचारी यांचे विम्याबाबत मार्गदर्शन मिळविणे कामी आस्थापना जा.क्र.२६८४ दि.२९/५/२०१५ अन्वये अग्निशमन विभागाकडील कर्मचा-यांची यादी संबधित कार्यालयास पाठविण्यात आलेली होती.त्यामध्ये पदनिहाय कर्मचा-यांचा किती रक्कमेचा विमा ? विमा हप्ता किती रक्कमेचा ? सदरचा विमा हप्ता हा अहमदनगर महानगरपालिका भरणार विमा स्वतः उमेदवार भरणार या बाबत मार्गदर्शन मागविले असता संदर्भिय पत्र प्राप्त झालेले आहे.

सदर पत्राचे अनुशंगाने अग्निशमन विभागाकडील एकत्रित कर्मचा-यांना रक्कम रू.३ कोटी ७१ लक्ष या राशीतुन विमा रक्कमे करीता त्यांनी विविध प्रकारचे विकल्प दिलेले आहेत व सदर विकल्पामध्ये सदरचा विमा हप्ता हा एक वर्षासाठी असून विमा पत्राचे नुतनिकरण प्रत्येक वर्षी आवश्यक आहे असे कळविले आहे.

त्याच प्रमाणे विमा रक्कमेच्या प्रदानाबाबत संबधित विभागाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीमधून ठाणे,कल्याण- डोंबिवली इ.महानगरपालिका त्यांचे अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागवित आहेत. असे सुचित केले आहे.

सबब सदर प्रमाणे अग्निशमन विभागाकडील अधिकारी / कर्मचा-यांचा विमा उतरविण्याचा असल्यास २४ तास वर्ल्ड वाईड कव्हर विथ मेडिकल एक्सपेन्सेस रक्कम रू.१ लक्ष ३७ हजार इतका वार्षिक हप्ता भरणे योग्य राहिल व येणा-या रिॲप्रोप्रिएशन बजट मध्ये सदर रक्कमेची तरतूद करणे आवश्यक असल्याने त्या नुसार आस्थापना विभाग प्रमुख त्याचप्रमाणे वित्तिय लेखाप्रमुख यांना योग्य ती कार्यवाही करणेस आदेशार्थ तथा पुढील निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे अग्निशमन विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित नुसार विमा हप्ता रक्कम मनपा निधीमधून दयावी किंवा कसे याविषयी मे.आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि, तपासून अभिप्राय दयावेत.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,प्रस्तावानुसार विमा संरक्षण देणेकामी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता अंदाजपत्रकीय तरतुद केलेली नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत ) २०११ चे कलम ८६ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार मान्यतेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सादर.

विषय :- अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचा-यांना समुह वैयक्तीक अपघात विमापत्रकांतर्गत विमा संरक्षण देणे बाबत.

संदर्भ :- १. मा.अग्निशमन सल्लागार महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे कार्यालयातील पत्र क्रमांक मअसे/५८बी./२०१५/१४६ दिनांक ०२/०६/२०१५

२. मा.सहाय्यक विमा संचालक, विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालयाकडील पत्र क्रमांक AIF-२२१५ \NG\PA\अ.नगर MCNE दि. १५/०९/२०१५ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भीन्कीत विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचा विमा वैयक्तीक अपघात विमा पत्रकाखाली उतरविणे आवश्यक असल्याने मा.अग्निशमन सल्लागार महाराष्ट्र शासन मुंबई यांनी निर्देश दिल्यानुसार व मा.सहाय्यक विमा संचालक ,विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे मार्गदर्शनानुसार अग्निशमन विभागाकडील एकत्रित कर्मचा-यांचा रक्कम रूपये ३ कोटी ७१ लक्ष या राशीभुत विमा रक्कमे करीता त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार २४ तास वर्ल्ड वाईड कव्हर विथ मेडीकल सस्पेन्सेस करीता रक्कम रूपये १ लक्ष ३७ हजार इतका वार्षिक हप्ता ३९ कर्मचा-यांकरीता भरावा लागणार असून सदरचा हप्ता भरणे कामी अगामी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये रक्कम रूपये २ लक्ष इतकी रक्कमेची तरतुद करणेस सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे पाठविणेस मान्यतेस्तव तथा पुढील आदेशार्थ व निर्णयास्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे अग्निशमन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित नुसार मान्यतेस हरकत नाही.

यावर मा. अतिरिक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि, "अ " नुसार प्रस्ताव मान्यतेकरीता स्थायी समितीकडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचा-यांना समुह वैयक्तीक अपघात विमापत्रकांतर्गत विमा संरक्षण देणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेबः- फक्त फायरब्रिगेडचे कामगार का ? इतर विभागांचे कामगारांचे विमा का उतरविण्यात येत नाही.इलेक्ट्रीक विभागाच्या कर्मचा-यांना रोज लाईट च्या पोल वर कामे असतात.फायरब्रिग्रेड च्या कर्मचा-यांना कधीतरी कॉल येतो.

मा.श्री.दिप चव्हाण :- १ लक्ष ३७ हजार रूपये भरा. त्याबददल आमचे काही म्हणणे नाही.परंतु हा विषय कशाच्या आधारे घेता.बाकीच्या कर्मचा-यांच्या संदर्भात काय? तरतुदीप्रमाणे देता येणार का? साल कोणते धरणार. चार दिवसांत तुम्ही काय काय करताल.

मा.उपायुक्त श्री.बेहरे साहेब :- नोव्हेंबर २०११ चा प्रस्ताव आहे.८६ सेक्शनची तरतुद आहे.

मा.श्री.दिप चव्हाणः- ८६ सेक्शन कसा वापरता येतो.लेखार्शिष नाही तर कसे देणार?तुम्हाला नविन बजेट मध्ये घ्यावे लागेल.मागच्या सभेच्या ईतिवृत्तामध्ये काय आहे ते सांगा. सर्वसाधारण सभेमध्ये हा विषय आपण लिहीला का नाही.मगचे विसरून जायचं आणी पुढच बघायच.

मा.श्री.सभापती साहेब :- नविन बजेट मध्ये हा विषय घ्या.व फायरमन बरोबर इल.विभागाचे कर्मचारी घ्या.

मा.श्री.दिप चव्हाण :- चेंबर मध्ये उरणारे सफाई कामगार सुध्दा त्यामध्ये घ्या.मलकापुर नगरपालिकेमधील चिफ ऑफिसरांना शिक्षा झाली होती.मलेरीया विभागातील कर्मचारी सुध्दा त्यामध्ये घ्या.यांचा विमा उतरविला तर त्यांना वैद्यकिय प्रतीपुर्ती पण तुम्ही देणार का?एकाच व्यक्तीला दोन क्लेम कसे देवू शकता.नगरसेविका खन खलिदा यांचे मिस्टरांचे बिल पेंडीग आहे.किती रक्कम आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.विसपुते :- मा.आयुक्त यांच्या मंजूरीने त्यांना ५०,०००/- दिले.

मा.श्री.गणेश भोसले :- मागच्या मिटींगला मी म्हटल होते.किती लोक आहे.भाग दोन लोक टेक्निकल आहे.त्यांना घ्या म्हटल होते.आता घेता येईल का ?

फायर फायटर विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- हो त्यांचा प्रस्ताव ठेवला आहे.शहर,केडगांव,सावेडी, मीळून ३९ कर्मचारी आहेत.त्यापैकी १२ कर्मचारी प्रशिक्षीत आहेत.

मा.सभापती साहेब :- फक्त १२ कर्मचारी प्रशिक्षीत आहेत,ते काय काय करतात.संपुर्ण शहराकरीता १२ कर्मचारी आहे.त्यांच्यावर आपली सर्व सुरक्षीता अवलंबून आहे.

मा.सभापती साहेब :- इलेक्ट्रीक विभागाचे लोक खांबावर चढतात.त्यांचा जीव धोक्यात घलून ते काम करीत असतात.

मा.श्री.दिप चव्हाण :- या विषयाचं काय करायचं सध्या हा विषय रदद करा.सन २०१६-१७ मध्ये याची तरतुद करा.

मा.श्री. कुमार वाकळे :- हा विषयामध्ये एकच विभागाचा समावेश केला असल्याने अन्य धोकादायक काम करणारे कर्मचा-यांचा समावेश करून अर्थसंकल्पीय सभेत घेण्यात यावा.हा विषय रद्द करण्यात यावा.

मा.सौ.सुनिता कांबळे :- अन्य कर्मचा-याचा समावेश करून प्रस्ताव ठेवण्यात यावा.हा विषय रद्द करावा.

मा.सभापती साहेब :- इतर विभागांचे जीव धोक्यात घालून काम कर्मचा-यांचा प्रस्तावामध्ये समावेश करून कर्मचा-यांना विमा संरक्षण देणे आवश्यक आहे.अन्य सर्व विभागांचे प्रस्ताव एकाच वेळी तयार करून अर्थसंकल्पात या करीता स्वतंत्र लेखार्शिषक निर्माण करून हा विषय अर्थसंकल्पीय सभेमध्ये घेण्यात यावा .हा विषय रद्द करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचा-यांना समुह वैयक्तीक अपघात विमापत्रकांतर्गत विमा संरक्षण देणेबाबत ठेवण्यात आलेल्या ऑफिस रिपोर्ट हा एकाच विभागाशी संबंधीतअसल्याने इतर सर्व विभागात कर्मचारी सुध्दा त्यांचा जीव धोक्यात घालून काम करतात त्या सर्व कर्मचा-यांना विमा संरक्षण देणे आवश्यक असल्याने .अन्य सर्व विभागांचे प्रस्ताव एकत्र तयार करून अर्थसंकल्पात या करीता स्वतंत्र लेखार्शिषक निर्माण करून हा विषय अर्थसंकल्पीय सभेमध्ये घेण्यात यावा .हा विषय रद्द करण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सुनिता कांबळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ५६ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स या पदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ : १) मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ८४८ दि. ०८/१२/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव.

२) मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ८४९ दि. ०८/१२/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की , संदर्भिय क्र. १ नुसार मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ८४८ दि. ०८/१२/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " जा.क्र.आस्थापना करारबध्द नेमणूक ३८२२ दिनांक १४/०९/२०१५ अन्वये १) डॉ.सौ.रेणूका प्रणव जोशी २) डॉ. सौ. शुभदा बाबासाहेब वाघ ( मदने ) ३) डॉ. सौ. सुनिता भगवान गाडेकर ४) डॉ.सौ. वैष्णवी मोतीलाल गोपाळघरे ह्या वैद्यकीय अधिकारी या पदावर करारबध्द पध्दतीने दिनांक २५/०६/२०१५ पासुन सहा महिन्यांकरीता कै.बा.दे.दवाखाना येथे हजर झालेले आहेत. त्यांच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक २४/१२/२०१५ रोजी संपत आहे. वरील वैद्यकीय अधिका-यांचे नेमणूक कालावधीमध्ये काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्ननेमणूक करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. तरी १) डॉ.सौ.रेणूका प्रणव जोशी २) डॉ. सौ. शुभदा बाबासाहेब वाघ ( मदने ) ३) डॉ. सौ. सुनिता भगवान गाडेकर ४) डॉ.सौ. वैष्णवी मोतीलाल गोपाळघरे यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देवुन दिनांक २७/१२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता कै.बा.दे.दवाखान्यासाठी वैद्यकीय अधिकारी या पदावर तात्पुरत्या स्वरुपात करारबध्द पध्दतीने पुनर्नेमणुक करणेस शिफारस आहे."असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

तसेच संदर्भिय क्र. २ नुसार मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचे कडील जा . क्र.कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ८४९ दि.०८/१२/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " जा . क्र . आस्थापना कंत्राटी नेमणूक ३८२३ दिनांक १४/०९/२०१५ अन्वये १) शितल गंगाराम शिंदे २) सौ.रेखा रमेश अमोलिक ३) सौ.निलिमा सतिष हिवाळे ४) शुभांगी अण्णासाहेब काळे ५) तृप्ती रावसाहेब बडे ह्या परिचारीका या पदावर तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने दिनांक २५/०६/२०१५ पासुन सहा महिन्या करीता कै.बा.दे.दवाखाना येथे हजर झालेल्या आहेत. त्यांच्या नेमणुकीचा कालावधी दिनांक २४/१२/२०१५ रोजी संपत आहे. त्यांचे नेमणुकीच्या कालावधीमध्ये काम समाधानकारक असुन त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्नेनेमणुक मिळणेबाबत इकडील कार्यालयास विनंती अर्ज दिलेला आहे. तरी वरील परिचारीका यांना नेमणुकीचा कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देवुन दिनांक २७/१२/२०१५ पासुन सहा महिन्याकरीता कै.बा.दे.दवाखान्यासाठी परिचारीका यापदावर तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने पुनेनेमणुक करणेस शिफारस आहे. ."असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवाखाना यांचे कडील जा.क्र. ५११ दिनांक २० /६/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बा.दे.दवाखाना

अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स या पदी संबधीतांची जा.क्र.आस्थापना करारबध्द नेमणूक ३८२२ दिनांक १४/०९/२०१५ अन्वये व जा.क्र.आस्थापना करारबध्द नेमणूक ३८२३ दिनांक १४/०९/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक २५/६/२०१५ पासुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर संबधीतांच्या सदरच्या मानधनावरील केलेल्या कालावधीतील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत सदरचा प्रस्ताव हा जा.क्र.आस्था.वर्क. ११५ दिनांक १९ / ०९ / २०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १७ दिनांक १४/१०/२०१५ अन्वये ठराव पारीत करुन कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवे करीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी ,स्टाफ नर्स या पदी अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर संबधीतांची करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | कार्यरत विभाग | सद्यस्थितीमधील तांत्रिक खंड देवुन जा . क्र . आस्था करारबध्द नेमणूक व दि. | सद्यस्थिती मधील सहा महिने नियुक्ती कालावधी | दरमहा मानधन रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. रेणूका प्रणव जोशी | वैद्यकीय अधिकारी | कै.बा.दे. | ३८२२ /१४/०९/२०१५ | २५/६/१५ ते २४/१२/१५ | २०,०००/- |
| २ | डॉ.वैष्णवी मोतीलाल गोपाळघरे | वैद्यकीय अधिकारी | कै.बा.दे. | ३८२२ /१४/०९/२०१५ | २५/६/१५ ते २४/१२/१५ | २०,०००/- |
| ३ | डॉ.सुनिता भगवान गाडेकर | वैद्यकीय अधिकारी | कै.बा.दे. | ३८२२ /१४/०९/२०१५ | २५/६/१५ ते २४/१२/१५ | २०,०००/- |
| ४ | डॉ. शुभदा बाबासाहेब वाघ (मदने) | वैद्यकीय अधिकारी | कै.बा.दे. | ३८२२ /१४/०९/२०१५ | २५/६/१५ ते २४/१२/१५ | २०,०००/- |
| ५ | रेखा रमेश अमोलिक | स्टाफ नर्स | कै.बा.दे. | ३८२३ /१४/०९/१५ | २५/०६/१५ ते २४/१२/१५ | ८,०००/- |
| ६ | निलिमा सतीष हिवाळे | स्टाफ नर्स | कै.बा.दे. | ३८२३ /१४/०९/१५ | २५/०६/१५ ते २४/१२/१५ | ८,०००/- |
| ७ | शिंदे शितल गंगाराम | स्टाफ नर्स | कै.बा.दे. | ३८२३ /१४/०९/१५ | २५/०६/१५ ते २४/१२/१५ | ८,०००/- |
| ८ | शुभांगी अण्णासाहेब काळे | स्टाफ नर्स | कै.बा.दे. | ३८२३ /१४/०९/१५ | २५/०६/१५ ते २४/१२/१५ | ८,०००/- |
| ९ | तृप्ती रावसाहेब बडे | स्टाफ नर्स | कै.बा.दे. | ३८२३ /१४/०९/१५ | २५/०६/१५ ते २४/१२/१५ | ८,०००/- |

सदर वरील संबधीतांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत ही दिनांक २५/१२/२०१५ पासुन समाप्त होत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स या पदांची मंजुर पदे , भरलेली पदे व रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | पदनाम | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | ३ | २ | १ |
| २ | स्टाफ नर्स | १४ | ९ | ५ |
| | एकुण | १७ | ११ | ६ |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यंत सदर आकृतीबंधास मा. शासना कडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबत : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायांकित प्रत.)

वरील तक्त्यामधील संबधीतांची जा. क्र. आस्थापना करारबध्द नेमणूक ३८२३ दिनांक १४/०९/२०१५ अन्वये अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर केलेल्या आदेशामध्ये अटी क्र. ७ नुसार सदरची करारबध्द नियुक्ती ही मा.पोलीस अधिक्षक यांचे कार्यालयाकडील चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्राच्या अधिन राहुन केलेली आहे. त्यानुसार वरील तक्त्यात दर्शविलेल्यामधील अनु. ७,८,९ यांचे मा.पोलिस अधिक्षक यांचे कार्यालयाकडून चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही

सद्यस्थितीमध्ये सदर्भ क्रं. २ नुसार मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी ,कै.बा.दे.दवाखाना यांचे कडील जा. क्र. ८४९ दिनांक ०८/१२/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बा. दे. दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्टाफ नर्स या पदी त्यांची केलेल्या सहा महिन्याच्या करारबध्द कालावधीतील मानधनावरील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक २७/१२/२०१५ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्नेनियुक्ती करणे बाबत मा. स्थायी समितीची याबाबत पुर्व मंजुरी होवुन निर्णय झाल्यास तद्नंतर अत्यावश्यक सेवेचा विचार करता संबधीतांच्या नियुक्ती आदेशामध्ये यापुर्वीची पुनश्चः अट समाविष्ट करुन सदरची नियुक्ती ही मा.पोलीस अधिक्षक यांचे कार्यालयाकडील चारित्र्य पडताळणी प्रमापत्राच्या अधिन राहुन नियुक्ती द्यावी लागेल.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे मा.शासनाच्या निर्देशानुसार शिशु जननी योजना राबविण्यात येत असल्यामुळे कै.बा.दे.दवाखान्यामध्ये रुग्णांच्या संख्येत वाढ झालेली असुन नागरिकांच्या आरोग्य सेवेच्या दृष्टीकोनातुन अत्यावश्यक बाब असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरीने कै . बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स या पदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्नेनेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक २७/१२/२०१५ पासुन पुढील सहा महिन्या करीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी खास बाब म्हणुन निर्णय झाल्यास त्याकामी दरमहा रुपये १,२०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ७,२०,००० /- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तातपुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. रेणूका प्रणव जोशी | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| २ | डॉ.वैष्णवी मोतीलाल गोपाळघरे | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ३ | डॉ.सुनिता भगवान गाडेकर | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ४ | डॉ. शुभदा बाबासाहेब वाघ (मदने) | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ५ | रेखा रमेश अमोलिक | स्टाफ नर्स | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ६ | निलिमा सतीष हिवाळे | स्टाफ नर्स | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ७ | शिंदे शितल गंगाराम | स्टाफ नर्स | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ८ | शुभांगी अण्णासाहेब काळे | स्टाफ नर्स | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ९ | तृप्ती रावसाहेब बडे | स्टाफ नर्स | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै. बा.दे.दवाखाना यांचे कडील जा.क्र. ८४८ दिनांक ०८ / १२ / २०१५ व जा.क्र. ८४९ दि. ०८/१२/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स या पदांवर वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या करारबध्द मानधनावरील करारबध्द नेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक २७/१२/२०१५ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स या पदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- किती लोक आहेत? कर्मचारी पुरेशे आहेत का ?

वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री.राजुरकर :- सर्व सेवा मोफत देतो.सध्या स्टाफ नर्स कमी आहे.लेबर रूमला नर्स आहे.आया ,शिपाई ,कमी आहे.

मा.सभापती साहेब :- आवश्यक असलेल्या कर्मचा-यांचे प्रस्ताव ठेवा.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी श्री.राजुरकर :- तातडीने प्रस्ताव ठेवतो.

मा.श्री.दिप चव्हाण :- आस्थापनावर किती पद आहे.

प्र.आस्थापना विभाग प्रमुख श्रीमती कुकडे :- २ डॉक्टर आहे.वैद्यकीय अधिकारी ४ जणांना पुर्ननियुक्ती दयायची आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- २०११ नुसार ५३ सेक्शन प्रमाणे मंजूरी.

मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे :- २०११ नुसार स्थायी समितीच्या मंजूरीने

मा.श्री.दिप चव्हाण :- ६ महिने खंडीत करून मुदतवाढ देतो.मानधन किती ? आकृतीबंध तुम्ही करायला तयार नाही.२००३ पासून आकृतीबंध पहातो.त्याचा शेवट कधी होणार ? दवाखान्याची काही तक्रार नाही.त्यांनी ती दयाला पाहिजे.

मा.सभापती साहेब :- या विषयावर महिला सदस्यांनी बोलायला पाहिजे.

मा.सौ.उषा ठाणगे :- म.न.पा. तर्फे मा.ना.श्री.शरद पवार साहेबांचा ७५ वा. वाढदिवस साजरा करावा.

मा.श्री.दिप चव्हाण :- कसा साजरा करायचा ते सांगा फक्त ठराव करून पाठवयाचा का किंवा कार्यक्रम करायचा.कि ठराव करून महासभेत ठराव करून विषय ठेवू मग आपण ठरवू ,शिफारस केली.

मा.सौ.उषा ठाणगे :- आपण कशा पध्दतीने वाढदिवस साजरा करायचा ते आपणसर्वनी मिळून ठरवावा.

मा.सभापती साहेब :- मा.ना.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने उपक्रम राबविणे त्याकरीता लागणारी आर्थिक तरतुद करणे या बाबतचा चा निर्णय मा.महासभेने घेणे करीता शिफारस करण्यात येत आहे.तसेच ऑफिस रिपोर्ट नुसार नमुद वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स यांना मानधनावर नियुक्ती देण्यात यावी.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टअहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स या पदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे तसेच महानगरपालिकेच्या दवाखान्यांमध्ये ब-याच ठिकणी अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने नागरीकांना वैद्यकिय सेवेपासून वंचित रहात आहेत.या करीता आवश्यक असलेल्या कर्मचा-यांचा प्रस्ताव तातडीने तयार करावा. हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

तसेच मा.ना.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने उपक्रम राबविणे, करीता लागणारी आर्थिक तरतुद करणे या बाबतचा चा निर्णय मा.महासभेने घेणे करीता शिफारस करण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सुनिता कांबळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ५७ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बुरूडगाव रस्त्यावरील कचरा डेपो येथे २०० केव्हीए चा ट्रान्सफार्मर व ५ नग एल.टी.पोल टाकणेबाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका विद्युत विभाग.

विनंती रिपोर्ट की,उपरोक्त विषयाबाबत पी.ए.जाधव,इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांनी संदर्भीय पत्रान्वये बुरूडगांव येथील कचरा डेपोवर मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्पासाठी विद्युत पुरवठा करणेबाबत कळविले आहे.

दि.२७/०८/२०१५रोजी मा.आयुक्त यांचे दालनात झालेल्या बैठकीमध्ये उपरोक्त प्रकल्पासाठी विद्युत पुरवठा करणेबाबत सुचित केलेले आहे.त्याअनुषंगाने सदर कामच्या अत्यावश्यकतेबाबत दि.२४/०९/२०१५ रोजी मा.शहरअभियंता ,इलेक्ट्रीक विभाग प्रमुख व इलेक्ट्रीक सुपरवायझर यांनी समक्ष पाहणी केलेली आहे.

बुरूडगांव कचरा डेपो येथे महानगरपालिकेच्या मालकीचे सर्व्हे नं.३४ येथील २० एकर जागा असून सन२००३ यावर्षामध्ये ६३ केव्हीए च ट्रान्सफार्मर बसविण्यात आला होता.त्या ट्रान्स्फार्मर बायो मेडीकल प्लॅन्ट ची ६३ किलो वॅटची मशीनरी चालत आहे.या वर्षी सदर ठिकाणी घनकचरा विभागामार्फत ओला व सुका कच-यावर प्रक्रिया करून खत निर्मीती प्रकल्पाची इमारत व विद्युत मशिनरीचे काम पुर्ण झालेले आहे.तथापी विद्युत मशिनरी चालविण्याकरीता नविन वीज जोडणीची आवश्यकता आहे.किंवा जुना असलेल्या ट्रान्सफार्मरची विद्युत क्षमता वाढविणे आवश्यकता आहे.परंतु भविष्यात कचरा डेपो सुधारणेकामी लागणारे विद्युत पुरवठयाकरीता वेळो वेळी लोड मागणी पेक्षा आताच २०० केव्हीए चा नविन ट्रान्सफार्मर व एल.टी.पोल बसवून प्रकल्प कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

तरी रक्कम रू.६,१२,०००/- फक्त (अक्षरी रक्कम रू.सहा लाख बारा हजार फक्त) चे खर्चास घनकचरा व्यवस्थापन खत प्रकल्प उभारणी अंतर्गत सन २०१५-२०१६ या लेखाशिर्षतर्गत कामास व खर्चास मंजूरी मिळणेबाबत आदेशार्थ सविनय सादर.

अंदाजपत्रकीय तरतुद सन २०१५-१६

लेखार्शिषक - घनकचरा व्यवस्थापन खत प्रकल्प उभारणी अंतर्गत

यापुर्वी सदर ठिकाणी काम झाल्याचे वर्ष - सन २००३

कामाचे नांव - नविन ट्रान्सफार्मर , इलेक्ट्रिक पोल बसविणे

दर सुची - डी.एस. आर सन २०१४-१५ ची दरसुची या कामाच्या अंदाजपत्रक तयार करण्यासाठी वापरण्यात आलेली आहे.

येणे प्रमाणे इलेक्ट्रीक सुपरवायझर यांचा अहवाल असे.

यावर इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचा अभिप्राय कि, उपरोक्त अहवालानुसार सदरचे काम घनकचरा व्यवस्थापन खत प्रकल्प उभारणी या लेखार्शिषका अंतर्गत रक्कम रू ६,१२,०००/- चे खर्चास व काम तातडीचे स्वरूपाचे असल्याने मान्यतेस्तव सादर.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,यथाप्रस्तावित नुसार घनकचरा व्यवस्थापनाचे प्रक्रिया प्रकल्पासाठी विद्युत कनेक्शन घेणे साठी प्रकल्प खर्च रक्कम रू.६.१२ लक्ष प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मान्यता देणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,प्रस्तावाप्रमाणे अममदनगर महानगरपालिका चे बुरूडगांव रोडवरील कचरा डेपो येथे २०० के.व्ही. ट्रान्सफार्मर व ५नग एल.टी.पोल टाकणे कामास रक्कम रू.६,१२०००/- चे खर्चास डेपोसुधारणा व खत प्रकल्प उभारणी सन २०१५-१६ अंतर्गत मान्यतेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) यथाप्रस्तावितनुसार अंदाजपत्रकीय तरतुदीस अधिन राहून काम करून घेणेस हरकत नाही.मे.आदेशार्थ

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,उपरोक्त सविस्तर अहवालानुसार व अंदाजपत्रकीय तरतुदीस अधिन राहून रक्कम रू.६,१२,०००/- चे खर्चाकरीता मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमतीदर्शक स्वक्षरी.

मा.फेरसादर,

विषय :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतीन बुरूडगांव रस्त्यावरील कचरा डेपो येथे २०० के.व्हिए चा ट्रान्सफार्मर व ५ नग पोल टाकणे बाबत.

संदर्भ मा.आयुक्त साो यांची दि.१७/११/२०१५ ची प्रशासकीय मान्यता.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर की,अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौज बुरूडगांव सर्व्हे ने.३९ येथील कचरा डेपो येथे सन २००३ मध्ये ६३ केव्हीए चा ट्रान्सफार्मर बसविण्यात आलेला आहे.त्यातून सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या बायो मेडिकल प्लॉट साठी विद्युत कनेक्शन घेतलेले आहे.त्याचा लोड तेवढाच आहे. त्यामुळे त्या ट्रान्सफार्मरवरून नविन विद्युत कनेक्शन घेण्यासाठी म.रा.वि.वि.कंपनीच्या मार्गदर्शनानुसार व भविष्यातील आवश्यकतेनुसार २०० केव्हिए चे ट्रान्सफार्मर बसविणेची आवश्यकता आहे.२०० केव्हिए चा ट्रान्सफार्मर व ५ नग एल टी पोल टाकणे करीता वरील संदर्भीन्वये मा.आयुक्त साो यांनी रक्कम रूपये ६,१२,०००/- रक्कमेस प्रशसकीय मान्यता प्राप्त आहे.

सदरचे काम अतितातडीचे आहे. घनकचरा प्रकल्पाची विद्युत मशिनरी चालविणे करीता नविन वीज जोडणीची आवश्यकता आहे.घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणीचे काम पुर्ण झालेले आहे.सदरचा खत प्रकल्प मा.राष्ट्रीय हरीत लवादप्रधिकरण पुणे यांनी दिनांक ५/११/२०१४ रोजी आदेश देवून प्रकल्प तातडीने कार्यान्वीत करणे बाबत आदेशीत केले आहे. न्यायालयीन बाबींमुळे सदर काम विनाविलंब करून घेणे आवश्यक आहे.

उक्त काम मनपा अधिनियमानुसार कलम ७३ अन्वये जाहिर निविदा देवून किंवा मराविवि कंपनी यांचेकडून १०० टक्के पुर्ण ठेव योजने अंतर्गत डिसेंबर १५ पुर्वी करून घेणे अशक्य प्राय आहे.परंतु तेथील उपलब्ध स्थिती पहाता ग्रामिण फिडर वरून दिवसातुन ८ ते१० तास विद्युत पुरवठा उपलब्ध होण्यासाठी हे काम तातडीने करावयाचे झाल्यास आणि कालमर्यादेचे भान ठेवून व कामाची आवश्यकता / निकड लक्षात घेवून स्थानिक सक्षम प्रवर्गातील व नोंदणीकृत तात्रिक ठेकेदारामार्फत आलेल्या निविदांचे दरपत्रक सक्षम दिनांक १९/११/२०१५ रोजी हातोहात मागवून घेतले आहेत त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ नं | ठेकेदाराचे नांव व पत्ता | प्राप्त दर | |
|---|---|---|---|
| | | कमी | जास्त |
| १ | पुजा इलेक्ट्रीकल्स इंजिनिअर्स ऑण्ड कॉन्ट्रॅक्टर अहमदनगर | अंदाजपत्रकीय दराने | .... |
| २ | रमा विजया इलेक्ट्रीकल्स,अहमदनगर | ... | ३% |
| ३ | प्रभंजन इलेक्ट्रीकल्स अहमदनगर | ... | ५% |

उपरोक्त पुजा इलेक्ट्रीकल्स इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर अहमदनगर हे ठेकेदार सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास इच्छुक असून त्यांचेकडून काम करून घेण्यासाठी तात्काळ त्यांना लेखी कार्यादेश देण्यात आलेले आहेत व त्यानुसार त्यांनी तात्काळ ते काम पुर्ण केलेले आहे.

वरील प्रकरणी वस्तुस्थिती विचारात घेता अशा प्रकारचे काम अनन्यसाधारण महत्व असलेले व परिस्थितीची निकड लक्षात घेता ते काम करून घेतले आहे.अशा पध्दतीने विना निविदा काम करणेसाठी महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ अनुसुची "ड" प्रकरण ५ नियम २(२ ) अन्वये मा.स्थायी समितीची मान्यता घेवून विना निविदा काम करून घेता येतो. परंतु दिनांक २४ नोव्हेंबर २०१५ पासुन विधान परिषदेची आचार संहिता लागू

झोलेने व त्यानंतर दिनांक १२/१/२०१५ रोजी पर्यत मा.स्थायी समिती सभा न झाल्याने मा.स्थायी समितीची मान्यता न घेता उक्त काम करून घेण्यात आलेले आहे तर अशा विना निविदा जाहिर सुचना प्रसिध्द न करता करून घेण्यात आलेल्या कामास मा.स्थायी समितीची कार्येत्तर मान्यता घेणे व करारनामा करून घेणे आवश्यक आहे.करीता प्रस्ताव मान्यतेस सादर./ क्ष

येणेप्रमाणे इलेक्ट्रीक सुपरवायझर यांचा रिपोर्ट असे.

यावर इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, उपरोक्त कामाची निकड घन कचरा प्रक्रिया उभारणीचे काम झालेले आहे. सदरचा खत प्रकल्प मा. राष्ट्रीय हरीत लवादाचे प्राधिकारण पुणे यांच्या आदेशान्वये व न्यायालयीन बाबीमुळे सदर काम विनाविलंब करून घेणे आवश्यक असल्याने उपरोक्त प्रस्तावा मान्येनेस्तव सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा. राष्ट्रीय हरीत लवाद यांनी बुरूडगांव स.नं.३४ मध्ये घनकचरा प्रकल्प त्वरीत सुरू करणेबाबत आदेशित केलेले असून त्याकरीता ट्रान्सफॉमेट उभारणे व कंडक्टर ओढणे इ. काम करणे आवश्यक आहे. काम तातडीचे असलेने विना निविदा जाहीर सूचना प्रसिध्द करता करून घेणेत आलेल्या कामास मा.स्थायी समितीची कार्योत्तार मंजुरी घेणे आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करणे मान्यतेस सादर.

यावर मा. उपायुक्त यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीतनुसार नमूद "क्ष" प्रमाणे विषय मे. स्थायी समिती सभेत ठेवणेकरीता मान्यतेस हरकत नाही. तथापी आदेशार्थ सविनय सादर./अ

यावर मा.अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" नुसार प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बुरूडगाव रस्त्यावरील कचरा डेपो येथे २०० केव्हीए चा ट्रान्सफार्मर व ५ नग एल.टी.पोल टाकणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.श्री. कुमार वाकळे :- माझ्या वॉर्ड मध्ये अनेक दिवसांपासून स्ट्रीट लाईट बंद आहे.विचारणा केली असता केबल नाही असे उत्तर दिले जाते.

इले.विभाग प्रमुख श्री.सातपुते :- ५० टक्के मटेरीयल आले आहे.रू. ७५ लाखाची बिले पेंडिग आहेत.मटेरिलय एक दोन दिवसांत आल्यानंतर काम करून देतो.

मा.श्री.अनिल बोरूडे :- जे सत्तेत आहे त्यांचेच फक्त कामे कारू नका, आमचे पण कामे करा.

इले.विभाग प्रमुख श्री.सातपुते :- मटेरियल नव्हतं आता मटेरियल आले आहे.काही अडचण नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- हा विषय काय आहे.

इले.विभाग प्रमुख श्री.सातपुते :- ओला कचरा व सुक्या कच-यावर प्रक्रिया करणे कामी प्रकल्पा करीता ६३ के.व्हि.ए.चा ट्रन्सफार्मर पुर्वीचा होता.आता २०० के.व्हि.ए.चा ट्रान्सफार्मर टाकायचा आहे.लोड वाढविण्यासाठी आवश्यक आहे.६ लाख रूपयांची आवश्यकता आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- आपण साडेचार कोटी तेथे ठेवले आहे.

घनकचरा विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- १ वर्षापुर्वी आपण जमा केले.

मा.श्री.दिप चव्हाण :- आम्ही ठराव करून कलेक्टर ऑफिसला विषय पाठवून, आपण पैसे जमा केले मग परत हा विषय घेण्याचे कारण काय ?

मा.उपायुकत श्री. बेहरे :- प्लॅन्ट आक्टोबर मध्ये पुर्ण झाला.विना निविदा हे काम आयुक्तांसमोर ठेकेदारांना बोलावून हे काम करून घेता येते म्हणून ही मान्यता घ्यावयाची आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ५/२ प्रमाणे कंटेनर खरेदी विषय का घेतला नाही. ठरावाची कॉपी कधी दिली ?

नगरसचिव श्री.वैद्यै :- काल दिला.मा.सभापतींची दि.२९/१/२०१६ रोजी सही झाली.

मा.श्री.दिप चव्हाण :- साडेचार कोटीचा विषय कलेक्टर कडे गेला. ६ लाखाचा विषय इथं का आला.माझ्या माहितीप्रमाणे इथं चुक होती आहे.तुम्ही पाहून घ्या. साडेचार कोटी भरल्यानंतर कोर्टानी त्यांना अधिकार दिले.तेव्हा सगळ काम त्यांनीच करायला पाहिजे.६ लाखाचा विषय स्थायी समितीमध्ये का आला.कोर्ट मॅटर आहे.६ लाख रू.आम्ही मंजूर करणार नाही.

मा.उपायुक्त श्री.बेहरे :- निविदा प्रक्रीया न केल्यामुळे मंजूरी घेत आहोत.

मा.सभापती साहेब :- आपल्या नगरशहराची घाण त्यांच्या भागा मध्ये आपण टाकतो त्यांना त्याचा त्रास होतो. आता सातपुते इंजी.माहिती पुर्ण देउ शकत नाहीत.ते बांधकामचे इंजी.आहेत पण काम इलेक्ट्रीक विभागाकडे काम करतात. ही माहीती कोणाला विचारावी. कोणत्याही डिपार्टमेंट मध्ये जे टेक्निकल कर्मचारी लागतात,ते त्याच ठिकाणी पाहिजे.ते टेक्निकल लोक त्याच ठिकाणी ठेवावे.या बाबतीत लक्ष दया. ही आयुक्त व उपायुक्त यांची जबाबदारी आहे.टेक्निकल लोकांची मला लिस्ट दया जर काही अडचणी आल्या तर ही जबाबदारी आयुक्त व उपायुक्त यांची राहील.

मा.श्री.दिप चव्हाण :- चेअरमन साहेबांनी आत्ता जो विषय काढला हाच विषय मी मागच्या वेळी काढला होता.किती काम आहे मलेरिया डिपार्टमेंट तरी तिथे उप आरोग्य अधिकारी पैठणकर यांना टाकले आहे. विसपुते साहेब सांगा अकौन्टच्या लोकांना तुमच्या चिडचिडपणा मुळे टेंशन येवू लागले आहे.तुम्हाला सुध्दा आणखी बी.कॉम झालेल्या स्टाफची गरज आहे.

मा.सभापती साहेब :- वसूली करणारे वसूली लिपीक पाहिजेत.शिपाई व बिगारी हेच वसूलीचे काम करतात. ज्या त्या क्षमतेप्रमाणे काम दया,व त्याची नोंद सेवापुस्तकात घ्या.

मा.उपायुक्त श्री. बेहरे :- ९० वसूली वॉर्ड आहेत.३२ लिपीक आहे.बाकीचे काम शिपाई ,बिगारी आहेत.

मा.श्री.दिप चव्हाण :- जर परीपुर्ण स्टाफ नसेल तर आपली आर्थिक परिस्थिती कशी सुधारेल.

आस्थापना विभाग प्रमुख श्रीमती कुकडे :- २८ पदे मंजूर आहे.२४ पदे भरली आहेत.४ पदे रिक्त आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- वसूलीपात्र मालमत्ता कशी विभागणी करता.आपल्या पालिकेचा आर्थिक बेस कुठे आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहरे :- वसुली विभाग

मा.श्री.कुमार वाकळे :- जे लोक महानगरपालिकेमध्ये घराची नोंद घ्यायला सांगण्यासाठी जातात.त्यांची नावे नोंदविली जात नाहीत. ५ वर्ष झाले तरी नागापूर मधील लोकांना घरपट्टी पाणीपट्टी येत नाही. हा सादर केलेला विषय मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.मंगल गुंदेचा :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.श्री.सातपुते यांची बदली बांधकाम विभागात करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- बुरूडगाव रस्त्यावरील कचरा डेपो येथे २०० केव्हीए चा ट्रान्सफार्मर व ५ नग एल.टी.पोल टाकणेबाबत च्या कामास ऑफीस रिपोर्ट नुसार हि सभा मान्यता देत आहे. सातपुतेंना बांधकामाचे शिक्षण असल्याने इलेक्ट्रीक विभागातून सातपुतेंची बदली बांधकाम विभागात करा. आणि तेथे टेक्निकल माहितगार कर्मचारी नेमा. इतरही टेक्निकल कर्मचारी त्यांच्या शिक्षणानुसार त्या त्या विभागात नेमा .

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील बुरूडगाव रस्त्यावरील कचरा डेपो येथे २०० केव्हीए चा ट्रान्सफार्मर व ५ नग एल.टी.पोल टाकणेबाबत च्या कामास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट, मंजूर खर्च मंजूर.

तसेच श्री.आर.जी.सातपुते यांना इलेक्ट्रीक बाबत तांत्रिक माहीती नसल्याने त्यांच्या कडील इलेक्ट्रीक विभागाचा चार्ज काढून बांधकाम विभागात बदली करण्यास हि सभा मान्यता देत आहे. तसेच इतरही टेक्निकल कर्मचारी त्यांच्या शिक्षणानुसार त्या त्या विभागात नेमण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ५८ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस बांधकाम साहित्य पुरवठा वार्षिक निविदा दर मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग.

विंनती पुर्वक कळविण्यात येते की, सन २०१५-२०१६ या आर्थीक वर्षाकरीता अहमदनगर महानगरपालिकेस लागणारे बांधकाम साहित्य उदा.खडी,डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल पॅचिंगसाठी,सिमेंट,राळा,चाळलेली वाळू,पोयटा माती,शहाबाद फरशी,हार्ड मुरुम,सॉफ्ट मुरुम,तांबडया विटा,लालमाती,लोखंडी सळया,लोखंडी अँगल,वेल्डींग मेश जाळी,प्रिकास्ट आर.सी. सी. स्लॅब, सिमेंटचे मेनहोल कव्हर्स फ्रेमसह,सिमेंट मोझॅक बेंचेस पाठीसह,एन.पी.२ क्लास हयुम पाईप कॉलरसह इ.पुरवठा करणेकामी मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमाकः मातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय,मुंबई-४०००३२ दि.६ ऑागस्ट २०१० अन्वये,ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन तसेच जाहिर टेंडर नोटीसला प्रथम वेळ ते पाचवी वेळ मुदतवाढ देवून वार्षीक निविदा मागविल्या असता,मुदतीत -

१)तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर.

याप्रमाणे एकच निविदा प्राप्त झालेली आहे.सदर निविदेचा व्यापारी (दराचा) लिफाफा उघडण्यात आला असून सोबतचा निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता -

अ.क्र.-१ ते ५१ चे दर तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांनी एकटयानेच दिलेले आहेत. अ.क्र.- १ ते ५१ चे साहित्याचे सन.२०१४-१५ चे मंजुर DSR दर नमुद करणेसाठी निविदा दराचा तुलनात्मक तक्ता जा.क्र.स्टोअर विभाग - २२५ दि.०१/१२/२०१५ अन्वये मा.शहर अभियंता, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस पाठविला असता त्यांनी निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.८ मध्ये सन २०१३-१४ चे सा.बां.विभागाकडील मंजूर दरसुचीतील उपलब्ध दर नमुद करुन जा.क्र.सा.बांधकाम विभाग-१५२२ दि.१५/१२/२०१५ अन्वये सदरचा तुलनात्मक तक्ता स्टोअर विभागाकडे पाठविलेला आहे.

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता -

अ.क्र.- १३,१७,१९,२८ ते ३८ चे DSR दर उपलब्ध नाहीत

सन.२०१३-१४ चे सा.बा.विभागाकडील मंजूर दरसुचीतील उपलब्ध दराची प्राप्त निविदातील दराशी तुलना करता -

अ.क्र.- १४ ते १५,१८ व २६ चे निविदा दर DSR दरापेक्षा कमी आहेत.

अ.क्र.- १ ते १२,१६,२० ते २५,२७,३९ ते ५१ चे निविदा दर DSR दरापेक्षा जास्त आहेत.

सन.२०१४-१५ करिता प्राप्त निविदातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दरात निगोसिएशन नंतर कमी करुन दिलेले दरास मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीने मंजुरी करिता शिफारस केलेले अंतिम दराशी प्राप्त निविदा दराची तुलना करता स्पर्धात्मकदृष्टया -

अ.क्र.- ११ चा दर लघुत्तम आहे.

अ.क्र.- १ ते १० व १२ ते ५१ चे दर अधिकतम आहेत.

तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांना जा.क्र.स्टोअर विभाग - २७० दि.०१/०१/२०१६ अन्वये मंगळवार दि.०५/०१/२०१६ रोजी सळाळी ११.३० वाजता मा.उपायुक्त(सा.)यांचे कार्यालयात निविदा दर वाटाघाटीसाठी समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविले असता ते समक्ष उपस्थित होते निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करुन सदर वेळी झालेल्या चर्चेत -

अ.क्र.१४ ते १५,१८ व २६ चे (एकूण ४ (चार) प्रकारचे बांधकाम साहित्याचे दर सन २०१३-१४ करिताच्या मंजूर DSR दराशी तुलना करता स्पर्धात्मकदृष्टया कमी असल्याने निविदेत दिलेले स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे दर मंजुरीबाबत शिफारस करण्यात येत आहे.

अ.क्र.१ ते १२,१६,२० ते २५,२७,३९ ते ५१ चे (एकूण ३३ (तेहतीस) प्रकारचे बांधकाम साहित्य सन २०१३-२०१४ चे मंजुर DSR दराप्रमाणे मंजुरीबाबत शिफारस करण्यात येत आहे.

अ.क्र.१३,१७,१९,२८ ते ३८ चे (एकूण १४ (चौदा) प्रकारचे बांधकाम साहित्याचे DSR दर उपलब्ध नसल्याने सन.२०१४-१५ करीता प्राप्त निविदेतील निगोसिएशन नंतर दिलेल्या व प्रशासकिय निविदा छानणी समितीने शिफारस केलेल्या दरात २.५% वाढ करुन येणा-या दराप्रमाणे मंजुरीबाबत शिफारस करण्यात येत आहे.

बैठकीत झालेल्या चर्चेप्रमाणे निविदादर धारक तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांनी मान्य करुन तसे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.

प्राप्त निविदा दरातील वाटाघाटी अंती मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीने संबंधित निविदाकार यांचे मंजुरीबाबत शिफारस केलेले दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.१० मध्ये नमुद करण्यात आलेले असून सदरचे दरास मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय निविदा छानणी समिती मार्फत करण्याचे ठरले आहे.

तरी मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीचे शिफारशी प्रमाणे निविदाकार तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांनी निविदा दर वाटाघाटी नंतर दिलेले (निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.१० मध्ये नमुद) दरास मंजुरी मिळणेबाबत स्टोअर विभाग दि.०६/०१/२०१६ चे प्रस्तावावर

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी " स्टोअर लिपिक व स्टोअर विभाग प्रमुख यांचा प्रस्तावान्वये A प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही."

मा.उपायुक्तसाहेब(कर)यांनी "प्रस्तावित A/अ नुसार दरपत्रके मंजूरीस मे.स्थायी समिती सभेत ठेवणेस हरकत नाही मे आदेशार्थ सादर."

मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांनी " स्टोअर विभाग प्रमुख उपरोक्त तुलनात्मक दर हे सन.२०१३-१४ व २०१४-१५ च्या DSR दराप्रमाणे घेतलेले आहेत तरी सदर दराची निविदा सन.२०१५-१६ या आथिक वर्षा करिता आहेत.तरी दराची तुलना करताना चालू DSR दर घेवून तुलना करणे उचित होईल तरी त्याप्रमाणे फेर अहवाल सादर करावा असा दि.१९/०१/२०१६ रोजी आदेश दिलेला आहे.

त्यावर मा.शाखा अभियंता यांनी खालील प्रमाणे फेर प्रस्ताव सादर केलेला आहे.

न्युनतम पुरवठादाचे दर साबावि व मजीप्राचे सन.२०१३-१४ चे दरसुचिशी तुलना करता वार्षिक पुरवठा दर सन.२०१३-१४ चे दर सुचिप्रमाणे करणेचे लेखीपत्र देवून मान्य केलेले आहे.

सन.२०१४-१५ ची दरसुचि सदयस्थितीत उपलब्ध आहे सर्व सर्वसाधारणपणे १५-२०% दरवाढ झ ाालेली आहे.त्यामुळे पुरवठादाराने दिलेले दर कमी असलेने छानणी प्रमाणे दर शिफारसिसह प्रस्ताव आदेशार्थ तथा मान्यतेस सविनय सादर.

सदर प्रस्तावावर मा.शहर अभियंता यांनी "प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर"

मा.अति.आयुक्त यांनी "उपरोक्त फेरसादर अहवालाप्रमाणे स्थायी समितीकडे सादर"असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

तरी मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीचे शिफारशी प्रमाणे निविदाकार तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांनी निविदा दर वाटाघाटी नंतर दिलेले (निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.१० मध्ये नमुद) वार्षिक निविदा दरास मंजुरी मिळावी हि विनंती.

सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

**सोबत -** संबंधित निविदाकार यांची बांधकाम साहित्य दराची यादी पान नं. १ ते ४
येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे

**निविदाकार - तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन**
**१५३,१ ला मजला,अंबर प्लाझा,**
**एस.टी.स्टँण्ड समोर,स्टेशन रोड,**
**अहमदनगर - ४१४ ००१.**

| निविदेतील अ.क्र. | मालाचा तपशील | परिमाण | निगोसिएशन नंतर दिलेले अंतिम निविदा दर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | हातफोड खडी<br>साईज - १ १/२" x २" | प्रती १ ब्रास | १४३३=०० |
| २ | मशिन फोड खडी<br>साईज - १.१/२" | प्रती १ ब्रास | १५४७=०० |
| ३ | मशिन फोड खडी<br>साईज - १" | प्रती १ ब्रास | १४७१=०० |
| ४ | मशिन फोड खडी<br>साईज - ३/४" | प्रती १ ब्रास | १४७१=०० |
| ५ | मशिन फोड खडी<br>साईज - १/२" | प्रती १ ब्रास | १४१५=०० |
| ६ | मशिन फोड खडी<br>साईज - १/४" | प्रती १ ब्रास | १५५६=०० |
| ७ | राळा १/४" | प्रती १ ब्रास | १५५६=०० |
| ८ | डांबर मिश्रीत हॉट-मिक्स माल पेचिंगसाठी<br>५.५० %Bitumen,<br>६० % १२ mm metal,<br>४० % ६ mm metal. | प्रती १ मे.टन | ४४३८=०० |
| ९ | सिमेंट आय.एस.आय.मार्क<br>प्रति ५०किलो वजन - ४३ ग्रेड | प्रती १ गोणी | ३२०=०० |
| १० | सिमेंट आय.एस.आय.मार्क<br>प्रति ५० किलो वजन - ५३ ग्रेड | प्रती १ गोणी | ३२०=०० |
| ११ | चाळलेली वाळू कोल्हार / पैठण | प्रती १ ब्रास | १७६९=०० |
| १२ | चाळलेली वाळू लोकल | प्रती १ ब्रास | १५८४=०० |
| १३ | पोयटा माती | प्रती १ ब्रास | ७४४=०० |
| १४ | हार्ड मुरुम<br>PWD स्पेसिफिकेशन प्रमाणे. | प्रती १ ब्रास | ६९८=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | सॉफ्ट मुरुम<br>PWD स्पेसिफिकेशन प्रमाणे | प्रती १ ब्रास | ६९८=०० |
| १६ | तांबड्या विटा<br>साईज - ९"x ४"x ३" | प्रती १००० नग | ५८००=०० |
| १७ | कुंड्या मातीच्या<br>१' व्यास x २' उंच | प्रती १ नग | ९९=०० |
| १८ | डबर | प्रती १ ब्रास | १५१०=०० |
| १९ | लालमाती | प्रती १ ब्रास | ९९२=०० |
| २० | लोखंडी सळया गोल<br>साईज - ६ mm | प्रती १ किलो | ४४=७५ |
| २१ | लोखंडी सळया गोल<br>साईज - ८ mm | प्रती १ किलो | ४४=७५ |
| २२ | लोखंडी सळया गोल<br>साईज - १० mm | प्रती १ किलो | ४४=७५ |
| २३ | लोखंडी सळया गोल<br>साईज - १२ mm | प्रती १ किलो | ४४=७५ |
| २४ | लोखंडी सळया गोल<br>साईज - १६ mm | प्रती १ किलो | ४४=७५ |
| २५ | लोखंडी अँगल<br>साईज - २५ x २५ x ३ mm | प्रती १ किलो | ४४=७५ |
| २६ | लोखंडी अँगल<br>साईज - ४० x ४० x ३ mm | प्रती १ किलो | ४८=०० |
| २७ | वेल्डींग मेश - जाळी<br>साईज - १" x १" | प्रती चौ.मिटर | १६०=०० |
| २८ | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब<br>साईज २'लांब x १'रुंद x ४"जाडी ,<br>स्टील ३.०० कि.ग्रॅ. | प्रती १ नग | ३९४=०० |
| २९ | प्रिकास्ट आर.सी. सी.स्लॅब<br>साईज-३'लांब x १'रुंद x ४"जाडी ,<br>स्टील ४.५० कि.ग्रॅ. | प्रती १ नग | ५०७=०० |
| ३० | प्रिकास्ट आर.सी.सी.स्लॅब<br>साईज-४'लांब x १'रुंद x ४"जाडी | प्रती १ नग | ७३२=०० |
| ३१ | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब<br>साईज ५'लांब x १'रुंद x४"जाडी | प्रती १ नग | ८४५=०० |
| ३२ | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब<br>हेवी क्लॉलिटी २० टन क्षमता<br>साईज - ४'लाब x १'रुंद x ५"जाडी | प्रती १ नग | १०७१=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | प्रिकास्ट आर. सी. सी.स्लॅब<br>हेवी क्लॉलिटी २० टन क्षमता<br>साईज - ५'लाब x १'रुंद x ५"जाडी | प्रती १ नग | १६९१=०० |
| ३४ | सिमेंट मेनहोल कव्हर्स<br>हेवी डयुटी गोल साईज फ्रेमसह<br>कव्हर- ६३० mm व्यास गोल x १०० mm जाडी<br>फ्रेम- ८००mm x १५०mm जाडी x<br>५४०mm निव्वळ | प्रती १ नग | १८४९=०० |
| ३५ | सिमेंट मेनहोल कव्हर्स<br>मेडीयम डयुटी गोल साईज फ्रेमसह<br>गोल साईज कव्हर - ६४५ mm व्यास गोल x<br>८० mm जाडी<br>फ्रेम -८४०mmx१३०mm जाडी x<br>५४०mm निव्वळ | प्रती १ नग | १२४०=०० |
| ३६ | सिमेंट मेनहोल कव्हर्स<br>चौकोनी साईज हेवी डयुटी फ्रेमसह<br>कव्हर १०१५mm x ५१७ mm x १००mm उंची,<br>फ्रेम -११८० mm x ७३० mm जाडी १५० mm,<br>९०० mm x ४५०mm निव्वळ | प्रती १ नग | २४८०=०० |
| ३७ | सिमेंट मेनहोल कव्हर्स<br>चौकोनी साईज मिडीयम डयुटी फ्रेमसह<br>कव्हर-७३०mmx ७३०mm x ६० mm उंची,<br>फ्रेम ८२० mm x८२० mm जाडी ११५ mm,<br>६०० mm x६०० mm निव्वळ | प्रती १ नग | १२४०=०० |
| ३८ | सिमेंट मोझॅक बेंच पाठीसह<br>साईज - ६०"x ३६"x ३" जाड<br>स्टॅड - २४" x १५" x३" जाड | प्रती १ नग | ३२६९=०० |
| ३९ | NP२ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज -१५०mm व्यास x लांबी २ मीटर | प्रती १ नग | ६६२=०० |
| ४० | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज - २०० mm व्यास x लांबी २ मीटर | प्रती १ नग | ७७४=०० |
| ४१ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह<br>साईज - २२५ mm व्यास x लांबी २ मीटर | प्रती १ नग | ८६२=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४२ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह- साईज - २५० mm व्यास x लांबी २ मीटर | प्रती १ नग | ९२८=०० |
| ४३ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह साईज-३०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | १५४७=०० |
| ४४ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह साईज-३५० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | १८९७=०० |
| ४५ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह साईज-४०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | २२०५=०० |
| ४६ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह साईज -४५० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | २५८५=०० |
| ४७ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह साईज -५०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | ३०२०=०० |
| ४८ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह साईज -६०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | ३९८७=०० |
| ४९ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह साईज-७००mm व्यासxलांबी २.५ मीटर | प्रती १ नग | ५७५२=०० |
| ५० | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह साईज -८०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | ६५७२=०० |
| ५१ | NP २ क्लास R.C.C. पाईप कॉलरसह साईज - ९०० mm व्यास x लांबी २.५ मीटर | प्रती १ नग | ८४२०=०० |

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--****--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस बांधकाम साहित्य पुरवठा वार्षिक निविदा दर मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे सभेमध्ये वाचन करण्यात आले.

मा.श्री.दिप चव्हाण :- कोणत्या सालासाठी पाहिजे, २०१६-१७ चे बजेट झालेआहे.

मा.सभापती साहेब :- हे साहित्य कोणत्या वर्षा करीता खरेदी करायचा दर आहे.

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- सन २०१५-१६ करीता.

मा.श्री.कुमार वाकळे :- सन २०१५-१६ संपायला किती काळराहीला आहे.

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- दोन महीने.

मा.सभापती साहेब :- सन२०१६-१७ करीता पुन्हा दर मागवीणार का? साहीत्स कधी खरेदी करणार ?

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- हा प्रस्ताव सन २०१५-१६ करीता आहे.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- ऑफिस रिपोर्ट मध्ये प्रस्तावीत केलेले दर सन २०१५-१६ करिता असले तरी मनपाच्या आर्थिक हिताचा विचार करता पुढील वर्षी करीता हेच दर मंजूर करून प्रस्तावीत साहित्य खरेदी करावे.विषय मंजूर करा.

मा.श्री.कुमार वाकळे :- वर्ष संपण्यास दोन महिने राहिल्याने पुढील वर्षा करिता याच दराने खरेदी करावी.

मा.सभापती साहेब :- मनपाच्या आर्थिक हिताचा विचार करता.ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.तसेच पुढील वर्षा करीता याच दराने बांधकाम साहित्य खरेदी करावी.

**ठराव :-** प्रशासकिय निविदा छानणी समितीचे शिफारशी प्रमाणे निविदाकार तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांनी निविदा दर वाटाघाटी नंतर दिलेल्या वार्षिक निविदा दरास सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस बांधकाम साहित्य पुरवठा वार्षिक निविदा दरास तसेच पुढील वर्षा करीता याच दराने खरेदी करण्यास ही सभा मान्यता देत आहे. विषय सर्वानुमते मंजूर. खर्च मंजूर.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ५९ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत ई - निविदा क्र.९०४ अहमदनगर महानगरपलिका हददीतील औरंगाबाद रोड वरील हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणेबाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१ . प्रशासकीय मान्यता : मा.शासन निर्णय क्र.नगरी -२०१० / प्र.क्र.२४/नवि३३ मंत्रालय मुंबई ३२ योचे दि.३१/३/२०११ अन्वये मंजूरी.

२ . प्रशासकीय मान्यता रक्कम : रू. ५६४.९१ लक्ष (रस्ता+विदयुत काम) सुधारित अंदाजपत्रकानुसार रस्त्याची अंदाजित रक्कम रूपये १,९०,९६,८०८/-

३. तांत्रिक मान्यतेची दरसुची : सन २०१३-२०१४

४. ऑनलाईन ई - निविदा क्र.९०४ सन २०१५-२०१६

५. निविदा विक्री कालावधी : दि.३०/४/२०१५ ते दि.५/६/२०१५ (पहिल्या मुदतवाढनुसार)

६. निविदा स्विकारण्याची तारीख : ६/६/२०१५ ते १६/९/२०१५ (तिस-या मुदतवाढनुसार)

७. निविदा उघडण्याची तारीख : १६/११/२०१५

८. कामाची मुदत : ९ महिने

९. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदा दरापेक्षा देकार |
|---|---|---|
| १ | मे.ए.सी. कोठारी , अहमदनगर | ११.११ % जादा दराने |

वरील तुलनात्मक तक्ताच्या अनुषंगाने मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे ११.११% जादा दराने असुन सदरचा देकार अवाजवी वाटत असल्याने संबंधित निविदाधारक मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर यांना दि.०१/१२/२०१५ रोजी मा. छाननी समितीसमोर वाटाघाटीस उपस्थित राहणेस जा.क्र.१४२३ दि.३०/११/२०१५ अन्वये पत्र दिले असता संबंधीत ठेकेदार यांनी सदरचे काम निविदा दरापेक्षा ७.००% जादा दराने दराने करणेस तयार असलेचे लेखी पत्रान्वये तयारी दर्शविली असुन सदरचे अंदाजपत्रक सन २०१३-२०१४ सा.बां. वि.च्या चालु दरसुचीशी नुसार असुन तसेच मा.छाननी समितीने सदरचे काम निविदा दरापेक्षा ७.००% जादा दराने करणेस शिफारस केल्याप्रमाणे उपरोक्त कामाची निविदा मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा रिपोर्ट असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत कामास मा. छाननी समितीने शिफारस केलेनुसार सदरची निविदा अंतिम मान्यतेसाठी मा. स्थायी समिती समोर सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे निर्णयाकरिता मा.स्थायी समिती समोर ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीत "अ" नुसार मे.स्थायी समिती सभेत नमूद प्रस्ताव निविदा मंजुरीसाठी सादर करणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ चे कलम ७३ नुसार आवश्यक आहे मे. आदेशार्थ स. सादर.

यावर मा. अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, उपरोक्त सविस्तर अहवालाप्रमाणे व प्रस्तावीत "अ" नुसार मान्यतेस्तव निर्णयाकरिता मा.स्थायी समितीकडे सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--****--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत ई - निविदा क्र.९०४ अहमदनगर महानगरपलिका हददीतील औरंगाबाद रोड वरील हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे ऑफिस रिपोर्टचे सभेमध्ये वाचन करण्यात आले.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट कोणा मार्फत आला आहे.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- बांधकाम विभागाचा रिपोर्ट असून मा.महाराष्ट्र शासनाचे सुवर्णजयंती योजने अंतर्गत हा रस्ता प्रस्तावित केला आहे.

मा.सभापती साहेब :- कोणत्या सालची योजना आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- सन २०११ सालामधील मा.महाराष्ट्र शासनाचे सुवर्णजयंती योजने अंतर्गत हा रस्ता प्रस्तावित केला आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत ई - निविदा क्र.९०४ अहमदनगर महानगरपलिका हददीतील औरंगाबाद रोड वरील हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणे बाबत असलेल्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत ई - निविदा क्र.९०४ अहमदनगर महानगरपलिका हददीतील औरंगाबाद रोड वरील हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणेबाबत मा.छाननी समितीने सदरचे काम निविदा दरापेक्षा ७.००% जादा दराने करणेस शिफारस केल्याप्रमाणे उपरोक्त कामाच्या निविदेस हि सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ६० शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये अहमदनगर शहरामध्ये विविध ठिकाणी गॅन्ट्री (दिशादर्शक फलक ) बसविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग विभाग.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येतो कि,अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण २१ रस्त्यावर गॅन्ट्री (दिशादर्शक फलक ) बसवणे बाबत मा.पोलिस निरीक्षक वाहतुक शाखा यांच्या कडेस गॅन्ट्री बसविणे बाबत ठिकाण निश्चित करीता संयुक्त स्थळ पहाणी करीता अनेक वेळेस पाठपुरावा करण्यात आला.सदर बाबत मा.पोलिस निरीक्षक यांनी स्थळ निश्चिती बाबत महानगरपलिकेमार्फत सविस्तर नकाशे व रस्त्यांची यादी वाहतुक शाखेकडे सादर करणे बाबत तोंडी सांगितले.

त्यानुसार संदर्भ क्रमांक १ नुसार मा.पोलिस निरीक्षक यांच्या कडेस रस्त्यांची यादी व नकाशे सादर केले.सदर बाबत शहर वाहतुक निरीक्षक शाखेमार्फत दि१७/१०/२०१५ रोजी शहरात विविध ठिकाणी गॅन्ट्री बसविणे बाबत महानगरपालिकेने दिलेल्या रस्त्यांच्या यादी व नकाशानुसार जाहिरात फलके बसविण्यास खालील अटी व शर्तीस अधिन राहून दाखला दिला आहे.

१) सदर गॅन्ट्री (दिशादर्शक फलक ) ही मोकळया जागेत लावून रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२) सदर गॅन्ट्री (दिशादर्शक फलक ) पर्यावरणास अडथळा निर्माण होण्याची शक्यता आढळून येत नाही.
३) दिशादर्शक फलकांची उंची जमीनीपासून ०९ मीटर पेक्षा जास्त असता कामा नये.
४) सदर दिशादर्शक फलकांमुळे वाहन चालकांचे लक्ष विचलीत होवून अपघात घडणार नाही याची दक्षता घ्यावी.
५) दिशादर्शक फलकाजवळून उच्च दाबाच्या विद्युत वाहन तारा गेलेल्या नसाव्यात
६) दिशादर्शक फलकांवर आक्षेपार्ह स्वरूपाची जाहिरात करू नये.
७) वाहतूक सिग्नल चिन्हांमध्ये गोंधळ निर्माण होईल अशा चिन्हाचा किंवा रंगाचा वापर फलकांवर करण्यात येवू नये.
८) दिशादर्शक फलक रस्त्यांचे पातळी पासून १२.२ मीटर पेक्षा अधिक उंचीवर उभारता येणार नाही.
९) जाहिरात फलकाचा पृष्ठभाग किंवा पृष्ठथळ हा रस्त्याचे पातळीपासून ०३ मीटर पेक्षा कमी नसेल इतक्या उंचीचा ठेवावा.
१०) अर्जदार यांना मुंबई प्रांतीक महानगरपालिका (जाहिरात फलक व नियंत्रण) नियम २००९ चे अधिन राहून जाहिरात फलक लावण्यास परवानगी देणेस हरकत नाही.

त्यानुसार सदर एजन्सीस कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी वरील प्रमाणे बाबींची दक्षता घेण्यात येईल व ठिकाण निश्चिती बाबत प्रत्येक रस्त्याचा सविस्तर नकाशा ठिकाणसह नगररचना विभागाकडून आराखडयास मंजूरी घेवून कार्यवाही करण्यात येईल.

त्यानुसार छाननी समितीने शिफारस केल्यानुसार निविदाकार शिरीष एन.लोढा यांनी वाटाघाटीनंतर मनपास रॉयल्टी पोटी गॅन्ट्री प्रती वर्ष नमूद केलेले रक्कम रू.६०००/-देणे बाबत व दराबाबत निर्णय घेणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समितीकडेस सादर करणे बाबत आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रकल्प अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय कि,अहवालानुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,विभागाने प्रस्तावित केल्यानुसार व नमुद "अ" प्रमाणे उक्त विषय मंजूरीस्तव मे.स्थायी समिती सभेत सादर करणे उचित होईल.मे.आदेशार्थ स सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,उपरोक्त सविस्तर अहवालानुसार व शहर पोलीस निरीक्षक शहर वाहतूक निगम शाख यांचे दि.१७/१०/२०१५ चे दाखविल्या प्रमाणे मंजूरीकरीता स्थायी समितीकडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--****--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये अहमदनगर शहरामध्ये विविध ठिकाणी दिशादर्शक फलक बसविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.दिप चव्हाण :- गॅन्ट्री म्हणजे काय ?

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- गॅन्ट्री म्हणजे हायवेला दिशा फलक बसविणे.

मा.श्री.कुमार वाकळे :- कोणकोणत्या रस्त्यांवर हे बसविण्यात येणार आहे.

प्रकल्पविभागप्रमुखश्री.मेहेत्रे :- या मध्ये स्टेशन रोड,टिळक रोड,केडगांव,माळीवाडा,जी.प.ओ.रोड,बालिकाश्रम रोड,कुष्ठधाम रोड,सारसनगर,पत्रकार चौक,जे रोड पी.डब्लू.डी.च्या ताब्यात आहेत ते रोड आपण घेतले नाही.२१ रोड घेतले आहे.

मा.सभापती साहेब :- तुम्ही सांगीतलेल्या २१ ठिकाणंव्यतिरिक्त इतर महत्वाच्या ठिकाणी दिशादर्शक फलक बसविण्याचे असतील तर त्या सुचना करण्यात याव्यात.

मा.श्री.सचिन जाधव :- दाळमंडई पासून जो रोड जातो तो महात्वाचा आहे.तो रोड घ्या.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- प्रति गॅन्ट्री ६०००/- रू.देणार आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- जाहिरात कर वेगळा असेल आणि गॅन्ट्री वेगळी

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- निम्या भागात जाहिरात निम्या भागात त्यांची जाहिरात असेल.

मा.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहराच्या लगत असणारी शहरे पुणे,नाशिक,औरंगाबाद या शहरांच्या धर्तीवर अहमदनगर शहराचे सुशोभिकरण व शहरात येणा-या बाहेरील नागरीकांना शहरातील रस्ते समजण्यास सोपे होणार असल्याने व महानगरपलिकेस रॉयल्टी स्वरूपात आर्थिक उत्पन्न मिळणार असल्याने सदरच्या विषयास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये अहमदनगर शहरामध्ये विविध ठिकाणी गॅन्ट्री (दिशादर्शक फलक ) बसविणे करीता छाननी समितीने शिफारस केल्यानुसार निविदाकार शिरीष एन.लोढा यांनी मनपास रॉयल्टी पोटी गॅन्ट्री प्रती वर्ष नमूद केलेले रक्कम रू.६०००/-देणे बाबत व दरास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ६१ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी ई - निविदा क्र.१०५३ चे दराबाबत निर्णय घेणेकरीता ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग.

मा.सादर, रस्ता बाजु मांडणी फी व स्लॉटर फी सन २०१४-१५ करीता ई - निविदा क्र.७०८ रक्कम रू.३८,७३,१०२/- रक्कमेची होती.मा.स्थायी समिती ठराव क्र.३८ दि.८-७-१४ नुसार श्री.विजयकुमार कुंडलीक म्हस्के यांस सदरचा ठेका रक्कम रू.५४,११,०००/-मध्ये देण्यात आला होता.मा.आयुक्त सो यांचे दि.३१-१-१५ चे मान्यतेने त्यांचा ठेका रद्द करण्यात आला व दि.१-२-१५ पासुन मनपा कर्मचा-या मार्फत रस्ताबाजु मांडणी फि वसूली सूरू करण्यात आली.तद्नंतर दि.२६-३-१५ चे मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने रू.५४,११,०००/-मध्ये १० % वाढ करून म्हणजेच रक्कम रू.५९,५२,१००/- ची ई - निविदा क्र.८९५ तीन वेळा प्रसिध्द करण्यात आली त्यास प्रतिसाद न मिळाल्याने मा.अति.आयुक्त यांचे दि.१९-६-१५ चे मान्यतेने दि.४-७-२०१५ रोजी सकाळी ११.००वाजता जाहिर लिलाव घेण्यात आला त्यास देखील प्रतिसाद न मिळाल्याने दि.१३-७-२०१५ रोजीचे मा.अति.आयुक्त यांचे मान्यतेने लिलावाची मुळ रक्कम कमी करणेबाबतचा प्रस्ताव मार्केट विभाग जा.क्र.१६१ दि.२२-७-२०१५ अन्वये मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सादर केला परंतु स्थायी समितीत ४५ दिवसात निर्णय न झाल्याने मा.आयुक्त यांचे आदेशाने सदरचा प्रस्ताव सादर केला असता मा.अति.आयुक्त यांचे दि.८-१०-१५ चे मान्यतेने रक्कम रूपये ४२,६०,४१२/- ची ई- निविदा क्र.१०५३ प्रसिध्द करण्यात आली त्यामध्ये खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तीन संस्थानी भाग घेतला.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | देकार रक्कम |
|---|---|---|
| १ | श्री.साई पेस्ट कंट्रोल | २५,६१,१११ |
| २ | एक्झिम पेस्ट कंट्रोल | २४,५१,१११ |
| ३ | श्री.शिवकृपा पेस्ट कंट्रोल | २४,११,१११ |

वरिल संस्थांना दि.१-१२-१५ रोजी मा.छाननी समितीकडे वाटाघाटी करिता बोलविण्यात आले सदर बैठकीस १) श्री.शिवकृपा सर्व्हिसेसचे निरज राठोड २) श्री.साई पेस्ट कंट्रोल यांचे वतीने श्री.राहुल नरेंद्र जामगांवकर हे उपस्थित होते.३) एक्झिम पेस्ट कंट्रोलचे कोणीही उपस्थित नव्हते श्री.साई कंट्रोल यांनी दि.५-१२-१५ रोजी पत्र देवून रूपये २५,६१,१११/- मध्ये रू.५०,०००/- वाढवून रक्कम रू.२६,११,१११ देणेबाबत तयारी दर्शविली तद्नंतर श्री.साई कंट्रोल यांस पुन्हश्च वाटाघाटी करिता दि.६-१-२०१६ रोजी बोलविले असता त्यांनी दि.६-१-२०१६ रोजीचे पत्र देवून रक्कम रू.२६,११,१११/- मध्ये रू.५०,०००/-वाढवून रक्कम रू.२६,६१,१११/- देणेबाबत तयारी दर्शविली याबाबत श्री.सोनु जॉन ढोणे अहमदनगर यांनी दि.३०-११-१५ रोजीचे पत्र देवून सदरचा ठेका,२८,००,०००/- घेणेस तयार असलेबाबत कळविले होते परंतु त्यांनी ई - निविदेत भाग घेतला नसल्याने त्यांचा अर्ज निकाली काढला आहे.तसेच श्री.सय्यद अजहर लियाकत यांनी देखील दि.११-१२-१५ रोजीचा अर्ज देवून निविदा भरण्यास अजून इतर संस्था इच्छुक आहे.पुन्हा निविदा काढावी त्यास ई - निविदा क्र १०५३ मध्ये तीन संस्थानी भाग घेतला आहे.त्याबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही निर्णय झाल्यानंतर निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असे कळवून त्यांचा अर्ज निकाली काढला आहे.

तथापी ई - निविदा क्र.१०५३ रक्कम रू.४२,६०,४१२ रक्कमेची पहिली निविदा होती त्यात श्री.साई पेस्ट कंट्रोल यांची प्राप्त देकार रक्कम २६,६१,१११/- एवढी आहे.ठेकेदाराने नमुद केलेल्या रक्कमेत व मनपाने

निश्चित केलेल्या रक्कमेत १५,९९,३०१/- ची तफावत आहे.तसेच एकवीरा चौक येथील बाजार उठवून खाजगी जागेत गेला असल्याने व तथील उत्पन्न आता मिळणार नसल्याने तसेच मनपा कर्मचा-यामार्फत प्रतीमहा मिळणारे १,००,०००/- उत्पन्न या सर्व बाबींचा विचार करता व मा.उपायुक्त (सा) यांचे अभिप्रायानुसार ई - निविदा क्र.१०५३ मधील मनपाच्या व ठेकेदाराच्या दरामधील तफावती बाबत मा.स्थायी समितीत निर्णय घेणे किंवा प्रशासना मार्फत फेर निविदा काढणे या पैकी एक निर्णय घेणेबाबत सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,यथाप्रस्ताविनुसार अपेक्षीत मुळ रक्कम रू.४२,६०,४१५/- चे रक्कमेवर प्राप्त निवीदा रू.२६,६१,१११/- एवढी आहे.करिता दर कमी करणेस व निवीदा अटी ,शर्ती निश्चित करतेवेळी प्रस्ताव ने स्थायी समिती सभेत सादर करणे उचित होईल मे. आदेशार्थ स.सादर.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय कि,

| सन | रक्कम | |
|---|---|---|
| सन २०१२-१३ | २५,०२,५०१ | ठेकेदारामार्फत |
| सन २०१३-१४ | ३५,२१,००१ | ठेकेदारामार्फत |
| सन २०१४-१५ | ------------ | ठेकेदार व मनपा कर्म. |
| सन २०१५-१६ | ------------ | डिसेंबर २०१५ अखेर मनपा कर्म. |

वरील प्रमाणे रक्कमेसह अहवाल सादर करावा.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अभिप्राय कि, मा.सादर, मा अति.आयुक्त साहेब यांनी आदेशीत केल्या नुसार मनपा कर्मचारी व ठेकेदार यांचे मार्फत रस्ता बाजू मांडणी फि व स्लॉटर फि वसूली बाबत अहवाल खालील प्रमाणे

| अ.क्र | आर्थिक वर्ष | रस्ताबाजू मांडणी फि वस्लॉटर फि वसूल रक्कम | ठेकेदारा मार्फत /कर्मचा-यांमार्फत |
|---|---|---|---|
| १ | २०१२-१३ | २५,०२,५०१/- | ठेकेदारामार्फत |
| २ | २०१३-१४ | ३५,२१,००१/- | ठेकेदारामार्फत |
| ३ | २०१४-१५ | ३१,३४,६४५/-<br>१,५३,२७०/-<br>-----------------<br>३२,८७,९१५/- | ठेकेदारा मार्फत +<br>मनपा कर्मचा-यां मार्फत |
| ४ | २०१५-१६<br>डिसेंबर २०१५ अखेर | ८,९७,०४०/- | मनपा कर्मचा-यां मार्फत |

वरील प्रमाणे अहवाल माहितीसस्तव व आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की,उपरोक्त सविस्तर फेर अहवालनुसार रस्ता बाजू मांडणी फि व स्लॉटर फि वसूल रक्कम सन २०१३-१४ व २०१४-१५ पेक्षा खूपच कमी आहे.त्यामुळे फेरनिविदा काढणे उचित होईल तरी मान्यतेस्तव सादर./ "अ "

यावर मा.आयुक्त यांचा अभिप्राय कि, "अ " प्रमाणे निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभेस सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--****--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी ई - निविदा क्र.१०५३ चे दराबाबत निर्णय घेणेकरीता ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- मागच्या जानेवारी मध्ये आपण भाजी मंडई उठविली आहे. आपण कर्मचा-यांमार्फत १ फेब्रुवारी पासून वसूल करतो.जाहिर लिलावाची प्रक्रिया राबविली त्यालाही प्रतिसाद आला नाही.फेरनिविदेची शिफारस करत असतांना आता जी ऑफर आहे ती २६ लाख ६१ हजार आहे.ती रक्कम असलेली निविदा मंजूर करावी की आपल्या कर्मचा-यांमार्फत वसूली करावी.या बाबत चा निर्णय या सभेत घेणे अपेक्षीत आहे.

मा.सभापती साहेब :- किती रक्कम वाढवून दिली आपलं नुकसान किती झाले आहे ?

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- सन.२०१२-१३ साली ठेकेदारा मार्फत २५,०२,५०१/- सन २०१३-१४ ठेकेदारा मार्फत ३५,२१,००१/- सन २०१४-१५ मध्ये ठेकेदाराम मार्फत ३१,३४,६४५/- व मनपा कर्मचा-यांमार्फत १,५३,२७०/- सन २०१५-१६ मनपा कर्मचा-यां मार्फत ८,९७,००४/- या प्रमाणे वसूल झाला आहे.

मा.सभापती साहेब :- ठेकापध्दतीनी ठेकेदारा मार्फत वसूली चांगली होते.मनपा कर्मचा-यामार्फत वसूली केल्यास दरमहा सव्वालाख रूपये कमी मिळतात हे महानगरपालकेचे आर्थिक नुकसानच होते.महिन्याप्रमाणे जे नुकसान झालं ते पैसे गेले कुठे.

मा.श्री.दिप चव्हाण :- आता आपल्या कर्मचा-यांनी जी वसूली केली त्यात किती नुकसान झालं आता जी निविदा आली ती दुप्पटीने आहे.अनारसे साहेब काय मत आहे सांगा छाननी समितीचा रिपोर्ट वाचा प्रशासनाचे नुकसान नाही.त्यानुसार मंजूर.

मुख्यलेखापरिक्षक श्री.अनाससे :- मनपा कर्मचा-यामार्फत प्रतीमहा मिळणारे १,००,०००/- उत्पन्न म्हणजे वर्षाचे फक्त १२ लाख होतात.आलेली निविदा व वाटाघाटी नंतर २६,११,१११/- ही रक्कम दुप्पटी पेक्षा जास्त आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- कर्मचा-यांकडून फारच कमी प्रमाणात वसूली होत आहे.महानगरपालिकेचे नुकसान होत असल्याने निविदा मंजूर करावी.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- निविदा मंजूर करावी.

मा.सभापती साहेब :- एकविरा चौक बाजार खाजगी जागेत गेला त्यामुळे ठेकेदाराचे उत्पन्न कमी झाले आहे. मनपा कर्मचा-यामार्फत प्रतीमहा मिळणारे १,००,०००/- उत्पन्न म्हणजे वर्षाचे फक्त १२ लाख होतात.आलेली निविदा व वाटाघाटी नंतर २६,११,१११/- ही रक्कम दुप्पटी पेक्षा जास्त आहे.या सर्व बाबींनुसार ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगपालिकेच्या स्थायी समितीमध्ये साधक बाधक चर्चे नुसार,या आधी काढलेल्या निविदेस व लिलाव प्रक्रियेस प्रतिसाद मिळत नसल्याने तसेच एकवीरा चौक येथील बाजार उठवून खाजगी जागेत गेला आहे व तेथील उत्पन्न आता मिळणार नाही.

तसेच मनपा कर्मचा-यामार्फत प्रतीमहा मिळणारे १,००,०००/- उत्पन्न या सर्व बाबींचा विचार करता अहमनगर महानगरपालिकेच्या रस्ताबाजु मांडणी फी व स्लॉटर फी ई - निविदा क्र.१०५३ चे दर हे म.न.पा कर्मचा-यांमार्फत मिळणा-या उत्पन्ना पेक्षा जास्त दिसुन येत आहे. व तुलनात्मक तक्त्या नुसार मा.छाननी समिती मधील वाटाघाटी अंती निविदे मधील अटी,शर्ती निश्चित करून श्री.साई पेस्ट कंन्ट्रोल यांची रक्कम रू.२६,६१,१११/- देकार रक्कमेच्या निविदेस हि सभा मन्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ६२ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडिल अ.क्र. १ ते ३० चे जुने निरूपयोगी भंगार साहित्य विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

**संदर्भ -** ई-निविदा क्र.१०४६

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागा कडील अ.क्र.१ ते ३० चे जुने निरुपयोगी भंगार साहित्य विक्री करणेकामी मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकःमातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई - ४०००३२ दि.६ ऑगस्ट २०१० अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन http://amc.maharashtra.etenders.in या वेबसाईटवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता मुदतीत-

१)तवाब हुसेन स्क्रॅप ट्रेडर्स,मुंबई.
२)एस.एस.खान स्क्रॅप मर्चंन्ट,सांगली.
३)रापटी स्टील्स्,मुंबई.
४)जगदंबा स्क्रॅप मर्चंन्ट,अहमदनगर.
५)शेख नासीर बेगजी,अहमदनगर.

याप्रमाणे पाच निविदा प्राप्त झालेल्या असून सदर निविदांचे व्यापारी (दराचे) लिफाफे उघडण्यात येवून निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता -

पाणी पुरवठा विभागा कडील अ.क्र.१ ते ३० चे जुने निरुपयोगी भंगार साहित्याची एकत्रित रक्कम रु.७,७७,९९९=०० फक्त हा दर शेख नासीर बेगजी,अहमदनगर यांचा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात जास्तीचा प्राप्त झालेला आहे.

पाणी पुरवठा विभाग जा.क्र.१२३५ दि.३०/०१/२०१५ चे प्रस्तावान्वये मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी अ.क्र.१ ते ३० चे जुने निरुपयोगी भंगार साहित्याची दिलेली अंदाजे ऑफिस किंमत रक्कम रु.६,५०,२५५=०० फक्त असून निविदाकाराने खरेदीसाठी दिलेली किंमत रक्कम रु.७,७७,९९९=०० फक्त असून सदरची किंमत हि ऑफिस किंमतीपेक्षा रक्कम रु.१,२७,७४४=०० फक्तचे अधिक आहे.

स्टोअर विभागामार्फत सादर केलेल्या दि.३०/१०/२०१५ चे प्रस्तावावर मा.आयुक्तसाहेब यांनी दि.०६/११/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये पाणी पुरवठा विभागा कडील अ.क्र.१ ते ३० चे जुने निरुपयोगी भंगार साहित्य विक्री निविदांतील प्राप्त अधिकत्तम निविदा दराचे निविदाकार शेख नासीर बेगाजी,अहमदनगर यांना जा.क्र.स्टोअर विभाग-२१२ दि.१६/११/२०१५ अन्वये निविदा दर वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविले असता ते समक्ष उपस्थित होते सदर वेळी बैठकीमध्ये समक्ष झालेल्या चर्चेप्रमाणे त्यांनी निविदेमध्ये दिलेल्या रक्कम रु७,७७,९९९=०० फक्त या दरामध्ये रक्कम रु.१२,०००=००फक्त दर वाढवून रक्कम रु.७,८९,९९९=०० फक्त यादराने सदरचे अ.क्र.१ ते ३० चे जुने निरुपयोगी भंगार साहित्य खरेदी करण्याचे मान्य केलेले असून तसे लेखी संमतीपत्र दिलेले आहे.

शहर पाणी पुरवठा विभागा कडील अ.क्र.१ ते ३० चे जुने निरुपयोगी भंगार साहित्य खरेदीकामी शेख नासीर बेगाजी,अहमदनगर यांनी निविदा दर वाटाघाटीनंतर दिलेली रक्कम रु.७,८९,९९९=०० फक्त हि

किंमत कार्यालयीन किंमतीपेक्षा अधिक असल्याने सदर किंमत शेख नासीर बेगाजी,अहमदनगर यांचेकडून वसुल करुन शहर पाणी पुरवठा विभागा कडील अ.क्र.१ ते ३० चे जुने निरुपयोगी भंगार साहित्य त्यांना विक्री करणेस मंजुरी देणेबाबत शिफारस मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीमार्फत करण्याचे ठरले आहे.

मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीचे शिफारशी प्रमाणे शेख नासीर बेगजी,अहमदनगर यांचेकडून त्यांनी शहर पाणी पुरवठा विभागा कडील अ.क्र.१ ते ३० चे जुने निरुपयोगी भंगार साहित्य खरेदीकामी निविदा दर वाटाघाटी नंतर दिलेली किंमत रक्कम रु.७,८९,९९९=००(अक्षरी रक्कम रुपये.सात लाख एकोन्नवद हजार नउशेनव्यांन्नव फक्त)वसुल करुन शहर पाणी पुरवठा विभागा कडील अ.क्र.१ ते ३० चे जुने निरुपयोगी भंगार साहित्य त्यांना विक्री करणेस मा.आयुक्तसाहेब यांनी दि.०८/१२/२०१५ रोजी मंजुरी दिलेली आहे.

संबंधित निविदाकार यांना जा.क्र.स्टोअर विभाग - २५२ दि.१५/१२/२०१५ अन्वये निविदा डिपॉझिट रक्कम भरुन करारनामा करुन देणेबाबत कळविले असता त्यांनी दि.३०/१२/२०१५ रोजी निविदा डिपॉझिट रक्कम भरुन संविदा पूर्ण केलेली आहे.

सदर बाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड)अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करणेबाबत स्टोअर विभाग दि.०६/०१/२०१६ चे प्रस्तावावर -

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी सहमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

मा.उपायुक्तसाहेब(कर)यांनी "प्रस्तावित नूसार 'अ' प्रमाणे मान्यतेस हरकत नाही"

मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांनी " 'अ' नुसार प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर " असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

तरी ई-निविदा क्र.१०४६ - पाणी पुरवठा विभागाकडील जुने निरुपयोगी भंगार साहित्य विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड)अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सविनय सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--****--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडिल अ.क्र. १ ते ३० चे जुने निरूपयोगी भंगार साहित्य विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- काय साहित्य आहे ते सांगा.

राजु गायकवाड :- पाईप,चेंबर कव्हर,खिडक्या,पंप,स्टपरपॅनल,व्होस,स्टार्टर पॅनल,चेसी वॉल,खराब कॉपर,

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- सरकारी किंमत ठरवलेली होती.६ लाख ५० हजार शासकीय किंमत होती.७ लाख ८९ हजार ९९९/- एवढी रक्कम आली. इलेक्ट्रीक ,पाणी पुरवठा,आरोग्य विभागाचे साहित्य होते.स्क्रॅपीची जी किंमत होती.

मा.श्री.दिप चव्हाण :- किंमत कुणी ठरविली.

मॅकॅनिकल इंजि.श्री.निकम :- स्क्रॅप चा भाव व वजना नुसार सरकारी किंमत ठरविली.

मा.श्री.छिंदम :- किती टन माल होता.

मॅकॅनिकल इंजि.श्री.निकम :- जी.आय.पाईप ४ टन ,वॉल ९ टन,ऑल्यु.२०० किलो ,पंपपॅनल१ टन,वॉल १०६० किलो,पटया ३० किलो,कॉपर १०० किलो,बार ३० किलो ,बोअरिंग साहीत्य

मा.सभापती साहेब :- रेट कुणी काढले होते.रक्कम किती झाली होती.आपल्या रेट पेक्षा किती जास्त आले.

मॅकॅनिकल इंजि.श्री.निकम :- ऑफिस ने ६,५०,२२५/- ठरविली त्यानंतर वाटाघाटी मध्ये ७,८९,९९९/- मान्य झाली त्या नुसार किंमत आली १,२७,७४४/- जास्त आले आहेत.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सुनिता कांबळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- जुने निरूपयोगी भंगार साहित्य विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीच्या निदर्शनास आली आहे.विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडिल अ.क्र. १ ते ३० चे जुने निरूपयोगी भंगार साहित्य विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीच्या निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.सुनिता कांबळे सही /-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ६३ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** म.न.पा. शाळा क्र.४ च्या संरक्षण भिंतीच्या आतील स्टेशन रोड,केडगांव स.नं. १२६ पैकी जागा व्यवसायासाठी जागा भाडे पोटी देणेसाठी दरमहा भाडे व अनामत रक्कम प्रमाणित करून मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका नगररचना विभाग.

संदर्भ :- १ मार्केट विभाग मनपा यांचेकडील पत्र क्र.१८१ दि.२७/०८/२०१४

२ . मा.नगरसेवक श्री बाळासाहेब मा.बोराटे यांची मा.आयुक्त सो‍ा यांना उददेशुन यादी

३ . श्री शरद पंडितराव खैरे यांचा दि.१४/१/२०१५ रोजीचा अर्ज

४ . मा.स्थायी समिती सभापती श्री. गणेश पुंडलिक भोसले यांची दि.१५/१/२०१६ राजीची यादी

५ . श्री.संजय भाउसाहेब कर्डीले यांचा दि.१८/१/२०१६ रोजीचा अर्ज.

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये मार्केट विभागाने सौ.ममता रापरिया,यांच्या अर्जानुसार मनपा शाळा क्र.४ च्या संरक्षक भिंतीच्या आतील स्टेशन रोड,केडगांव स नं १२६ पैकी मधलि पोलिस चौकी जवळील कोप-यातील १० फुट X १० फुट इतकी जागा भाडे पोटी देणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर करणेसाठी दरमहा भाडे व अनामत रक्कम प्रमाणीत करून मिळणे बाबत कळविलेले आहे.व संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये मा.नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनीही सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर घेणेबाबत मागणी केलेली आहे.

तसेच संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये श्री. शरद पंडितराव खैरे यांनीही सदर शाळेच्या संरक्षक भिंतीच्या आत १० फुट बाय २० फुट जागा भाडे तत्वावर मागीतलेली असुन संदर्भिय पत्र क्र.४ अन्वये मा. स्थायी समिती सभापती श्री. गणेश पुंडलिक भोसले यांनी सदर जागा अर्जदार श्री. शरद पंडितराव खैरे यांना भाडेतत्वावर देणे बाबत प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे सादर करणेबाबत यादी दिलेली आहे. तसेच संदर्भिय पत्र क्र.५ अन्वये श्री. संजय भाउसाहेब कर्डीले यांनीही शाळा क्र.४ च्या संरक्षक भिंतीच्या आतील पोलिस चौकी जवळील कोप-यातील १० फुट X १० फुट इतकी जागा भाडेतत्वावर मागीतलेली आहे.

उक्त प्रकरणाबाबत या विभागाचा अभिप्राय पुढील प्रमाणे देत आहे.

विषयांकित जागेत मनपाची शाळा क्र.४ असुन अहमदनगर शहराच्या दुस-या सुधारित मंजुर विकास योजनेत सदर जागा विद्यमान शाळा (सार्वजनिक - निमसार्वजनिक) वापरासाठी दर्शविलेली आहे. सदर शाळे भोवती विद्यमान संरक्षक भिंत असुन, शाळेच्या संरक्षक भिंतीच्या आत दक्षिण - पश्चिम कोप-याजवळ जुनी पोलिस चौकी आहे. सदर पोलिस चौकी जवळील कोप-यातील त्रिकोणी जागा श्री. कर्डीले व सौ. रपारिया या दोघांनी एकच जागा मागीतलेली आहे व श्री. खैरे यांनी रस्त्यासमोरील शाळेच्या संरक्षक भिंतीच्या आत जागा मागीतलेली आहे.

मंजुर विकास योजनेत ती विद्यमान शाळा (सार्वजनिक - निमसार्वजनिक) वापरासाठी दर्शविलेली आहे. त्यामुळे या जागेवर वाणिज्य व्यवसाय हा वापर अनुज्ञेय करता येणार नाही. त्यामुळे अर्जदार यांना ही जागा देणे संयुक्तीक होणार नाही. तथापी मा. सभापती स्थायी समिती अहमदनगर मनपा यांचे दि.१५/१/२०१६ च्या यादी नुसार श्री. खैरे यांनी मागणी केलेल्या जागेचा भाडे निश्चिती बाबतचा अहवाल खालील प्रमाणे- **/अ**

अ] श्री. खैरे यांना देण्यात येणा-या जागेचे क्षेत्र २०० चौ.फुट म्हणजे १८.५९ चौ.मी. इतके आहे.

ब]खुल्या जागेची सन२०१५ च्या शासकीय दरानुसार होणारी किंमत(विभाग क्र.८/१)दर रू.८०६०/-प्रति चौ.मी.

क] जागेचे एकुण मुल्य = १८.५९ x ८०६०/-= १४९८३५/- एकुण जागेच्या मुल्याच्या १२ % इतके उत्पन्न मनपास मिळणे आवश्यक आहे.

ड] वार्षिक भाडे = १४९८३५x ३५x१२% = १७९८०/-

इ] दरमहा भाडे = १७९८०-१२= रू. १४९८/-

सबब दरमहा भाडे रू. १४९८/- इतके दरमहा भाडे आकारणे योग्य होईल.

व अनामत रक्कम जागेच्या मुल्याच्या ५०% म्हणजे साधारण पणे रू.७५०००/- इतकी घेणे योग्य होईल.

येणप्रमाणे नगररचनाकार यांचा रिपोर्ट असे

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रस्तावीनुसार मंजूर विकास योजनेत अर्जदाराने मागणी केलेली जागा ही विद्यमान शाळा या वापरासाठी आहे. त्यामुळे या जागेवर वाणिज्य वापर करण्यासाठी जागा देता येणार नाही.

यावर मा.अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, उपरोक्त सविस्तर अहवालाप्रमाणे व "अ" प्रमाणे अर्जदार यांना जागा देणे संयुक्तीक होणार नाही. तथापि निर्णयाकरिता मा. स्थायी समिती कडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- म.न.पा. शाळा क्र.४ च्या संरक्षण भिंतीच्या आतील स्टेशन रोड,केडगांव स.नं. १२६ पैकी जागा व्यवसायासाठी जागा भाडे पोटी देणेसाठी दरमहा भाडे व अनामत रक्कम प्रमाणित करून मिळणे विषयी आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर हद्दीच्या योजनेनुसार ती जागा व्यावसायासाठी देता येते. ही जागा रिकामी पडलेली आहे.तेथे लोक कचरा टाकतात.महानगरपालिकेला जर दोन पैसे मिळतात तर ती जागा भाडेतत्वावर देण्यास काही हरकत नाही.

मा.सौ.उषा ठाणगे :- फेज -२ ची पाईप लाईन टाकणेकामी काम सूरू करणेकामी संबंधीत ठेकेदारास आदेश दयावेत अन्यथा आंदोलन करावे लागेल.थोडे काम राहिलेले आहे.

मॅकॅनिकल इंजि.श्री.निकम :- १५ दिवसात काम करायला सांगीतले आहे.त्याच्यावर कार्यवाही करण्याचा प्रस्ताव महासभेकडे पाठविला आहे.

मा.सो.उषा ठाणगे :- या बाबत मागच्या स्थायी समिती मध्ये पत्र दिले आहे.आता परत देणार आहे.

मा.सभापती साहेब :- फेज -२ सारखी मोठी योजना पुर्ण होण्यास उशीर झाला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- झेडपी च्या टाकीमघून कुणाला ६ इंची पाईपलाईन दिली. रविवारच्या दिवशी पाण्याच्या टाकीतून पाईपलाईन कशी दिली.

मॅकॅनिकल इंजि.श्री.निकम :- पोलीस हेडक्वार्टर मध्ये मध्ये पी.डब्लू.डी चे काम आहे. त्यांनी अंतर्गत पाईप लाईन टाकण्याचे काम केले असेल,ती त्यांची अंतर्गत बाब आहे. पण आपल्या टाकीला जोडलेली नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- पाईपलाईन घेतली,आता जोडली की नाही ते तुम्ही पहा. ते काम म.न.पा.चे आहे कि,पी.डब्लू. डी चे ते आपण पाहून घ्या.

मा.सभापती साहेब :- जर पाईपलाईन जोडली असेल तर का व कशी जोडली, आणी टाकली असेल तर कोणाच्या परवानगीने टाकली ते पहा.

मॅकॅनिकल इंजि.श्री.निकम :- टाकीपर्यत आणली असेल तर पाहून घेतो.

मा.सभापती साहेब :- जर कुणी आपल्या म.न.पा.च्या जागेवर अतिक्रमण करून व्यवसाय करत असेल तर त्यापासून आपल्याला काही फायदा होतो का?

मा.श्री.दिप चव्हाण :- बिग बाजार समोर म.न.पा.च्या मालकीचा ३००० स्के.फुटचा ओपन स्पेस आहे.तेथे पार्कींग केले तर उत्पन्न सुरू होईल.

मा.सभापती साहेब :- इथे मार्केट विभागाचे कोण आहे.अहमदनगर महानगरपालिकेचे सावित्रीबाई फुले मार्केट कधी बांधले व किती स्केअर फूट चे बांधकाम आहे.कुणाला सांगता येईल ते सांगा.

इले.विभाग प्रमुख श्री.सातपुते :- साधारण:२००६-०७ च्या आसपास ते मार्केट बांधले आहे.

मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी :- सन २००७ साली बांधण्यात आले.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल (फेज -२) भाजी मार्केट येथील १७ हॉल सन २००६ पासून २०१५ पर्यत भाडयाने दिले गेले नाहीत.याबाबत माहिती घेतली असता हॉलचे ,गाळयाचे किंवा इमारतीचे भाडे ठरविणारे नगररचना विभाग अवास्तव भाडे आकारणीचा प्रस्ताव सादर करतात.त्यामुळे सरकारी कार्यालये,संस्था,व्यापारी हया सदर १७ हॉल भाडयाने गेले नाहीत.

मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी :- भाडे ठरविण्याचे काम नगररचना विभागाचे आहे ते सांगता येणार नाही.

मा.श्री.सचिन जाधव :- या जागेचे भाडे कमी करणेबाबत ठरावात नमूद करा.

मा.सभापती साहेब :- सध्या हया १७ हॉलची परिस्थीती काय आहे.

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- दुरावस्था झालेली आहे.

मा.सभापती साहेब :- चौकशी केली असता परिसरातील नागरिकांनी हागणदार युक्त परिस्थिती निर्माण केली आहे.या इमारतीतील हॉलचे दरवाजे, खिडक्या वर जाण्याचे मार्गावरील गेट,संपूर्णपणे मोडकळीस आले आहे. हॉलचा कलर गेला असल्याने इमारत खुप जुनी असल्याचे वाटते.त्याचप्रमाणे सदरील हॉल मध्ये विद्युत व्यवस्थाच नसल्याचा अजब प्रकार पहावयास मिळाला , काही भागात लाईट फिटींग आहेत.त्या लोंबकळत आहे व मोडकळीस आल्या आहेत.

मा.श्री.दिप चव्हाण :- बांधकाम संदर्भात परवानगी साठी नगररचना विभागाकडे प्रस्ताव असेल.

मा.सभापती साहेब :- १७ हॉलचे भाडे कमी न करून १० वर्षे या काळात किती नुकसान झाले.जे लोक गाळे घ्यायला तयार असतील त्यांनी स्वत:खर्च करून ते घेणार असलेल्या हॉल व गाळयांची दुरूस्ती करून , ती खर्च रक्कम भाडयातून वजा करून ते गाळे भाडयाने देण्यात यावेत.असा प्रस्ताव सादर करा.

मा.उपायुक्त साहेब :- हया इमारतीतील गाळे,हॉल भाडयाने देण्याबाबत कितीतरी वेळा जाहिरात काढली,पण प्रतिसाद मिळत नाही.

मा.सभापती साहेब :- तुम्ही रेट जास्त लावता म्हणून नुकसान होत आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- बुरूडगांव रोड येथील मार्केट जसे दिले त्या पध्दतीने करा.

मा.सभापती साहेब :- दुरूस्तीचे किती इस्टीमेंट आहे.

शहर अभियंता श्री सोनटक्के :- साडे नउ लाख रूपये

मा.सभापती साहेब :- तुम्ही ठेका पध्दतीने दया.

मा.श्री.सचिन जाधव :- नॉमीनल रक्कम ठरवून निविदा मागवा.५४ लाखचे टेंडर आपण २६ लाख रूपयांना देतो.तर मग या कॉम्प्लेक्स चे भाडे कमी करून निविदा मागवा,गाळे भाडयाने गेले तर पालिकेला उत्पन्न सूरू होईल.

मा.सभापती साहेब :- १० ते १५ लाख रूपये भाडे मिळाले असते.

मा.श्री.सचिन जाधव :- रोड टच गाळयांना जो रेट असतो तोच रेट आतमध्ये असलेल्या गाळयांना असतो.लोक कसे घेतील.श्री.वखारे सोडून मार्केट विभागाचे काम दुसरे कोणी करू शकत नाही का?त्याला विथुन काढा.दुसरा माणूस ताबडतोब टाका.

मा.सभापती साहेब :- पालिकेत अशी स्थिती आहे की,काही कर्मचारी वर्षानवर्ष त्याच जागेवर असल्याने कर्मचा-यांनी असा समज करून दिला आहे की,त्यांना बदली केली तर त्या विभागाचे काम होणार नाही. त्यामुळे कर्मचा-यांमध्ये अहमपणाची वृत्ती वाढून अडवणूकीची प्रवृत्ती वाढली आहे.अशा कर्मचा-यांच्या लगेच बदल्या करा.काम कोणी आधी शिकलेले नसतात.नवीन कर्मचारी थोडया वेळात शिकतील.पण त्यामुळे कामे मार्गी लागतील.बदली झाली तरी कर्मचारी बदली जागेवर सुटत नाहीत.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- आजच्या आज श्री.वखारे यांची बदली करून टाका.आस्थापना विभाग प्रमुखाने ताबडतोब प्रस्ताव पुटअप करा.

मा.सचिन जाधव :- महासभेमध्ये ठराव होतो.भाडे रेडिरेकनर प्रमाणे व डिपॉझिट कस घ्यायचे ते ठरल होते.प्रोसीडिंग मध्ये वेगळ करून आलं.

मा.दिप चव्हाण :- ठराव आहे किंवा नाही.

मा.उपायुक्त श्री बेहेरे :- ठरावाप्रमाणे कार्यवाही केली.

प्र.नगरसचिव श्री.वैद्य :- चर्चा आणि ऑफिसरिपोर्ट प्रमाणे ठरावाची कार्यवाही केली असेल.

मा.श्री.दिप चव्हाण :- जर ठरावाप्रमाणे अंमलबजावणी होत नसेल तर लोक पैसे कसे भरतील.परत आपण २टक्के शास्ती त्यांचेकडून घेतो.ठराव आपल्यामुळे झाला आहे.सरसकट शास्ती मुळे रक्कम वाढली.

मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी :- शास्ती व नोटीस फि नाही.

मा.सचिन जाधव :- ठरावाच काय झालं.सहा महिन्याचं भाडे रेडीरेकनर प्रमाणे घ्यावे.

मा.सभापती साहेब :- मनपाच्या शाळा बाबत भाडे वसुली होते का ?

मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी :- काही प्रमाणात होते.

मा.सभापती साहेब :-माझ्याकडे कला विकास मंडळ,अहमदनगरयांचाम्यु.शाळा नं.३,सांगळे गल्ली, अहमदनगर येथील दुस-या मजल्यावरील रिकाम्या खोल्या व महिलांसाठी स्वच्छता गृह उपलब्ध करून देणे बाबत अर्ज आला आहे.त्यांना सन २००० मध्ये ४ खोल्या दिल्या होत्या.त्याचे भाडे दरवर्षी भरतात.त्यांच्या मागणी प्रमाणे त्यांच्या कडील असलेल्या ४ खोल्या शेजारील रिकामी असलेली १ खोली व महिलांसाठी स्वच्छता गृहास जागा देण्यात यावी.

मा.सौ.मंगल गुंदेचा :- भाडे क्लीअस असेल तर संस्थेस १ खोली देण्यास हरकत नाही या संस्थेमध्ये उत्तम चित्रकार,कलाशिक्षक,हस्तकलाकार,शिल्पकार निर्माण झाले आहेत.

मा.सभापती साहेब :- केडगांव सर्व्हे नं.१२६ पैकी म.न.पा.शाळा क्र.४ च्या भिंतीच्या आतील जागा भाडेतत्वावर देणे बाबत काय तरतुद आहे.

नगररचनाकार विभाग श्री.जोशी :- अहमदनगर शहराच्या मुळ हद्दीच्या विकास योजनेतील ई.पी.६२ मधील तरतुदी नुसार शैक्षणीक संस्थेची जागा वाणीज्य वापराकरीता देता येते.एकुण क्षेत्रफळाच्या १५ टक्के बांधकामास परवानगी आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :-अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे श्री. शरद पंडीतराव खैरे यांना २०x१०ची श्री. संजय भाउसाहेब कर्डीले यांना १०x१०ची जागा देण्यांत यावी.सांगळे गल्लीतील कला विकास मंडळ शाळेच्या अर्जानुसार जागा द्यावी.सावेडीच्या सावित्रीबाई फुले संकुलातील १७ हॉलचे भाडे कमी करून भाडयाने द्या व दुरूस्ती त्यांनाच करू घ्यावी व दुरूस्ती खर्च भाडयातून वजा करून द्यावा.

मा.सौ.मंगल गुंदेचा :- श्री.शरद पंडीतराव खैरे यांना २०x१० ची श्री.संजय भाउसाहेब कर्डीले यांना १०x१० ची जागा देण्यांत यावी.कला विकास मंडळाला जागा द्या.सावित्रीबाई फुले संकुलातील हॉल भाडे कमी करून हॉल घेण्यास तयार असलेल्यांना द्यावेत व दुरूस्त करून भाडयातून रक्कम वळती करावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील १७ हॉलचे भाडे कमी करून संस्था,व्यापारी व इतर कोणी गाळे घ्यायला तयार असतील त्यांनी स्वतः खर्च करून दुरूस्ती करून घेण्यात यावी.या दुरूस्ती करीता खर्च होणारी रक्कम भाडयातून वजा करून ते गाळे भाडयाने देण्यात यावेत.तसेच कला विकास मंडळ,अ.नगर यांच्या ताब्यात असलेल्या ४ खोल्या शेजारील रिकामी असलेली १ खोली ११ वर्षाकरीता व महिलांसाठी स्वच्छता गृहास जागा देण्यात यावी. तसेच अहमदनगर शहराच्या मुळ हद्दीच्या विकास योजनेतील ई.पी.६२ मधील तरतुदी नुसार शैक्षणीक संस्थेची जागा वाणिज्य वापराकरीता देता येते.एकुण क्षेत्रफळाच्या १५ टक्के बांधकामास परवानगी आहे.त्यानुसार श्री. शरद पंडीतराव खैरे यांना २०x१० ची श्री.संजय भाउसाहेब कर्डील यांना १०x१० ची जागा ११ वर्षाकरीता भाडेतत्वावर देण्यात यावी.

**ठराव :-** सभागृहात झालेल्या चर्चे नुसार अहमदनगर शहराच्या मुळ हद्दीच्या विकास योजनेतील ई.पी.६२ मधील तरतुदी नुसार शैक्षणीक संस्थेची जागा वाणीज्य वापराकरीता देता येते.एकुण क्षेत्रफळाच्या १५ टक्के बांधकामास परवानगी आहे.त्या तरतुदी नुसार स्टेशन रोड,केडगांव स.नं.१२६ पैकी म.न.पा. शाळा क्र.४ च्या संरक्षण भिंतीच्या आतील जागेपैकी पोलीस चौकीच्या उत्तरे कडील २०x१० फुट जागा श्री. शरद पंडीतराव खैरे यांना व पोलीस चौकीच्या दक्षीणे कडील १०x१० फुट जागा श्री. संजय भाउसाहेब कर्डील यांना व्यावसायासाठी ११ वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे.तसेच यांना देण्यात येणा-या जागेबाबत सर्व कार्यालयीन प्रक्रीया पार पाडून भाडे व डिपॉझीट ठरवून जागा देण्याची कार्यवाही करण्यात यावी.आणि पुढील कार्यवाही सर्व संबंधीत विभागांनी करावी.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील १७ हॉलचे भाडे २५ ते ३० टक्क्यांनी कमी करून ते संस्था,व्यापारी व इतर कोणी गाळे भाडयाने घ्यायला तयार असतील त्यांना देण्यात यावेत.त्यांनी स्वतः खर्च करून दुरूस्ती करून घेण्यात यावी.या १७ हॉल च्या दुरूस्ती करीता खर्च होणारी रू.१०,००,०००/- (रू.दहा लाख फक्त) पर्यतची रक्कम भाडयातून योग्य रकमेच्या हप्त्याने वजा करून ते गाळे भाडयाने देण्यात यावेत.तसेच कला विकास मंडळ,सांगळे गल्ली,अ.नगर यांनी आज रोजी दिलेल्या पत्रानुसार म्युनिसीपल शाळा क्र. ३ मधील त्यांच्या ताब्यात असलेल्या ४ खोल्या च्या शेजारील रिकामी असलेली १ खोली ११ वर्षाकरीता भाडेतत्वावर देण्यास व महिलांसाठी स्वच्छता गृहाची सोय करून देण्यास ही सभा मान्यता देत आहे.देण्यात येणा-या जागेबाबत सर्व कार्यालयीन प्रक्रीया पार पाडून भाडे व डिपॉझीट ठरवून जागा देण्याची कार्यवाही करण्यात यावी.आणि पुढील कार्यवाही सर्व संबंधीत विभागांनी करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही/-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ६४ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मागासक्षेत्र अनुदान विकास निधी अंतर्गत सन २०१५-१६ चे लेखाशिर्षामध्ये वाढीव तरतूद करणे्बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की,मागासक्षेत्र अनुदान विकास निधी अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेस मा.शासनाकडून सन २००८-०९ ते सन २०१३-१४ पर्यत रू.११४०.००लाख इतका निधी प्राप्त झालेला आहे.आज अखेर सन २०१५-१६ साठी करण्यात आलेल्या रू.२७०.००लक्षचे तरतुदीसह एकूण रू.८६३.१३ लाख इतका खर्च झालेला आहे.त्यामुळे सन २०१५-१६ साठी करण्यात आलेली रू.२७०.००लक्ष तरतूद संपली असल्याने चालू आर्थिक वर्षासाठी आणखी वाढीव रू.२७७.००अशी एकूण रू.५४७.००लक्षची तरतूद करणे आवश्यक आहे.

तरी मागासक्षेत्र अनुदान विकास निधी अंतर्गत कामे प्रगतीपथावर असल्याने व सदर कामांची देयके चालू आर्थिक वर्षात खर्ची पडणार असल्याने सन २०१५-१६ चे पुर्नअर्थसंकल्पामध्ये मुळ तरतुद रू.२७०.००लाख यामध्ये आणखी रू.२७७.००लाख इतकी जादा तरतूद करून एकूण रू.५४७.००लाख इतकी सुधारीत तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत)२०११ चे कलम १०३ प्रमाणे करणेस मान्यता मिळणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रभाग अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.प्र.शहर अभियंता यांचा अभिप्राय कि,सन २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रकात मुळ तरतुद रू.२७०.००लक्ष मध्ये रू.२७७.०० लक्षची वाढ करून एकूण रू.५४७.००लक्ष सुधारीत तरतुद महा.महानगरपालिका अधिनियम (सुधारीत)२०११ चे कलम १०३ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,कनिष्ठ अभियंता व शहर अभियंता यांचे अहवालाप्रमाणे मागासक्षेत्र अनुदान निधी अंतर्गत सन २०१५-१६ करीता प्राप्त.शासन अनुदानानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत) २०११ चे कलम १०१ नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त(कर) यांची स्वाक्षरी

यावर मा अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,उपरोक्त सविस्तर अहवाल प्रमाणे तसेच अधिनियम तरतुदी अन्वये मागासक्षेत्र विकास अनुदान निधीची चालू वार्षाकरिता एकूण रक्कम रू.५४७.०० तरतूद करणेकामी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,तपासून अभिप्राय दयावेत.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,कनिष्ठ अभियंता व शहर अभियंता यांनी सादर केलेले प्रस्तावानुसार मागासक्षेत्र विकास अनुदान निधी अंतर्गत सन २०१५-१६ करीता प्राप्त शासन अनुदानानुसार व शिल्लक अनुदानावर महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारित) अधिनियम २०११ चे कलम १०१ नुसार कार्यवाही करणे योग्य राहिल.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय कि, Reappropriation चे एकत्रीत ठेवावे,मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय कि,मानपा अधिनियम २०११ चे कलम १०१ नुसार कार्यवाहीस्तव मा.स्थायी समितीत सादर करणेस्तव

यावर मा.उपायुक्त(सा) यांची स्वक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे मागासक्षेत्र अनुदान विकास निधी अंतर्गत सन २०१५-१६ चे लेखाशिर्षामध्ये वाढीव तरतूद करणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्या प्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ. सुनिता कांबळे :- केडगाव पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगती पथावर आहे. या कामास निधी प्राप्त असुन पाणीपुरवठा विभागाकडील केडगाव पाणीपुरवठा योजने अंतर्गत टाकण्यात आलेल्या जलवाहिनी वरून नळ कनेक्शन बदलणे या लेखाशिर्षाखाली सन २०१५-२०१६ वाढीव तरतुद करण्यात यावी.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- बी.आर.जी.एफ. मधील तसेच पाणीपुरवठा विभागाकडील केडगाव पाणीपुरवठा योजने अंतर्गत टाकण्यात आलेल्या जलवाहिनी वरून नळ कनेक्शन बदलणे कामे प्रगती पथावर आहे या कामांस निधी कमी पडू नये या करीता वाढीव तरतुदीस व सदरचा निधी चालू अर्थिक वर्षा मध्ये खर्च होणार असल्याने व महानगरपालिका अधिनियम (सुधारित ) २०११ चे कलम १०१ नुसार कार्यवाही करणे करीता हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मागासक्षेत्र अनुदान विकास निधी अंतर्गत तसेच पाणीपुरवठा विभागाकडील केडगाव पाणीपुरवठा योजने अंतर्गत टाकण्यात आलेल्या जलवाहिनी वरून नळ कनेक्शन बदलणे हि दोन्ही कामे प्रगती पथावर असल्याने व सदर कामांची देयके चालू आर्थिक वर्षात खर्ची पडणार असल्याने सन २०१५-१६ चे अर्थसंकल्पामध्ये ऑफिस रिपोर्ट नुसार वाढीव तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत)२०११ चे कलम १०१ प्रमाणे कार्यवाही करणेस हि सभा मान्यता देत आहे.विषय मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- ६५ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र राज्य सुवर्ण नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर)राबविणे बाबत घरकुल योजने अंतर्गत संजयनगर व वारूळाचा मारूती परिसर पाणी पुरवठा योजना नालेगांव त घरकुल योजना पर्यत गुरूत्ववाहीनी ,आर.सी.सी.ई.एस.आर.१.५० लाख लि.व १.००लाख लिटर उर्ध्वनलीका,पंपींग मशिनरी इत्यादी कामाची ई - निविदा बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग.

संदर्भ : १) ई - निविदा क्र. १०४४

२) दि. ०७/११/२०१५, दि. १८/११/२०१५, दि. ०१/१२/२०१५ व
दि. १२/०१/२०१६ रोजीची छाननी समिती

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की, विषयांकित कामाची ई निविदा क्र. १०४४ प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कामासाठी १) मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर २) साई असोसिएटस, औरंगाबाद अशा दोन निविदा प्राप्त झाल्या. सदर निविदांचा तांत्रिक लिफाफा उघडला असता साई असोसिएटस, औरंगाबाद हे निविदाधारक निविदेतील अटी व शर्तीनुसार पूर्तता करत नसल्याने त्यांची निविदा अस्विकृत करून मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचेकडील प्राप्त निविदांचा तांत्रिक लिफाफयामधील सर्व कागदपत्रे यथायोग्य आढळून आल्याने आर्थिक दराचा लिफाफा दि.०७/११/२०१५ रोजी उघडण्यात आला असता २० % जादा दर म्हणजेच रक्कम रू. १,३६,१७,४८०/- ची निविदा प्राप्त झाली.

प्राप्त निविदा दर अवाजवी असल्यामुळे मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन यांचेशी वाटाघाटी करण्यात आली. त्यानुसार मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन यांनी सदरचे काम चालू दरसुची सन २०१४-२०१५ नुसार ९.९९ % जादा दराने काम करणे तयार असल्याचे लेखी पत्र दि. १८/११/२०१५ रोजी दिले. परंतू त्यांनी दिलेले दर हे देखील जास्तीचे असल्यामुळे या कामाच्या वाटाघाटीसाठी पुन्हा मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन यांना बोलविण्यात आले. दि. ०१/१२/२०१५ रोजीच्या मा. छाननी समितीच्या बैठकी दरम्यान विषयांकित कामाचे निविदाधारक मे. एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचेशी वाटाघाटी झाली. त्यावेळेस मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन यांनी सदरचे काम चालू दरसुचीच्या (सन २०१४-२०१५ च्या) ४.९९ % जादा दराने म्हणजेच रू. १,१९,१४,१६०/- करणेस तयार असल्याचे सांगितले. परंतू वाटाघाटी विषयीचे लेखी पत्र देताना सदरचे काम ७.७७ % जादा दराने करणेस तयार असले बाबत मे.एस.आर.कन्स्ट्रक्शन यांनी लेखी पत्र दिले होते. / " अ "

मे. एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांनी दिलेल्या दरा बाबत वाटाघाटीविषयी अंतीम निर्णय घेण्याच्या दृष्टीने दि. १२/०१/२०१६ रोजी मा. छाननी समीतीत मा. सभापती तथा उपायुक्त (सा.), मा.उपसभापती तथा मा. उपायुक्त (कर) तसेच पुढील सदस्य मा. मुख्यलेखाधिकारी, प्र. शहर अभियंता श्री. सोनटक्के व्ही.जी., कनिष्ठ अभियंता श्री. गाडळकर जी.के. हे उपस्थित होते. चर्चे दरम्यान मे. एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती दिलेल्या अंदाजपत्रकीय दराच्या (रू.१,१३,४७,९००/-) चे ७.७७ % जादा म्हणजेच रू. १,२२,२९,६३२ इतके दराची अंतीम करण्यात यावी असे ठरले.

विषयांकित कामाची मे. एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांची वाटाघाटीनंतर ७.७७% जादा दराची निविदा स्विकृतीस मा.छाननी समितीकडून शिफारस करण्यात आली आहे.

तरी मा. छाननी समितीने शिफारस केलेनुसार सदरची निविदा अंतीम मान्यतेसाठी मा. स्थायी समितीची मंजूरी करिता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर करणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.
येणे प्रमाणे पाणी पुरवठा शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय कि,दि.१२/१/१६ चे छाननी समितीने शिफारस केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय कि,शाखा अभियंता व विभाग प्रमुख यांनी प्रस्तावित केल्नुसार मा.स्थायी समितीची अंतिम मंजूरीस्तव सादर करावे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांची स्वक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,"अ" कारनास्तव दिनांक १/१२/२०१५रोजीचे सभेमध्ये वाटाघाटीत मौखिक मान्य केले नुसारच निविदा मंजूर करणे योग्य अन्यथा फेरनिविदा मागविणे शिफारस आहे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र राज्य सुवर्ण नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर)राबविणे बाबत घरकुल योजने अंतर्गत संजयनगर व वारूळाचा मारूती परिसर पाणी पुरवठा योजना नालेगांव त घरकुल योजना पर्यत गुरूत्ववाहीनी ,आर.सी.सी.ई.एस.आर.१.५० लाख लि.व १.००लाख लिटर उर्ध्वनलीका,पंपींग मशिनरी इत्यादी कामाची ई - निविदा बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्या प्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा योजनेबाबत माहिती सांगा.

मॅकॅनिकल इंजि.श्री.निकम :- घरकुल योजनेसाठी पाणी पुरवठा करणे कामी १५० लाख क्षमतेची टाकी व ती भरण्यासाठी २०० व्यासाची पाईपलाईन व नालेगांव येथील पाण्याच्या टाकी बाबत चा प्रस्ताव आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- छाननी समितीने किती टक्के जादा दराने निविदा मंजूर केली आहे.

मॅकॅनिकल इंजि.श्री.निकम :- सदर ची निविदा २० टक्के जादा दराने प्राप्त झाली.मे.एस.आर.कंन्ट्रक्शन यांचे शी वाटाघाटी मध्ये ९.९९% जादा दराने काम करण्यास तयार असल्याचे लेखी पत्र दिले.पुन्हा वाटाघाटी करीता बोलविले असता ४.९९% जादा दराने काम करण्यास तयार असल्याचे सांगीतले परंतू वाटाघाटी विषयी लेखी पत्र देतांना सदरचे काम ७.७७% जादा दराने करण्यास तयार असल्यासे लेखी पत्र दिले.

मा.सभापती साहेब :- मे.छाननी समितीने काय शिफारस केली आहे.

मॅकॅनिकल इंजि.श्री.निकम :- छाननी समितीने ७.७७%जादा दराने काम करण्याची शिफारस केली आहे.

मा.सभापती साहेब :- छाननी समितीने घेतलेल्या शिफारसी प्रमाणे मान्य करण्यात यावा.

मा.श्री.कुमार वाकळे :- छाननी समितीने शिफारस केल्याप्रमाणे ७.७७%जादा दराने काम करणा-या संस्थेची निविदा मंजूर करण्यात यावी.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- छाननी समितीच्या शिफारसी नुसार निविदा मंजूर करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र राज्य सुवर्ण नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर)राबविणे बाबत घरकुल योजने अंतर्गत संजयनगर व वारूळाचा मारूती परिसर पाणी पुरवठा योजना नालेगांव त घरकुल योजना पर्यत गुरूत्ववाहीनी ,आर.सी.सी.ई.एस.आर.१.५० लाख लि.व १.००लाख लिटर उर्ध्वनलीका,पंपींग मशिनरी इत्यादी कामाची छानणी समितीने शिफारस केलेली७.७७%जादा दराने काम करण्याची ई - निविदा मंजूर करावी.

**ठराव :-** सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र राज्य सुवर्ण नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर)राबविणे बाबत घरकुल योजने अंतर्गत संजयनगर व वारूळाचा मारूती परिसर पाणी पुरवठा योजना नालेगांव ते घरकुल योजना पर्यत गुरूत्ववाहीनी ,आर.सी.सी.ई.एस.आर.१.५० लाख लि.व १.००लाख लिटर उर्ध्वनलीका,पंपींग मशिनरी इत्यादी कामाच्या, छाननी समिती ने केलेल्या शिफारशी नुसार,मे. एस.आर.कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांच्या ७.७७ % च्या जादा दराच्या ई - निविदेस ही सभा मान्यता देत आहे. विषय मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५

विषय क्रमांक- ६६ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** यश पॅलेस ते चाणक्यचौक रोडवरील,आनंदऋषीजी हॉस्पीटल ते गुगळे बंगला माणिकनगर लगत असणारी रस्त्यापैकी जागा पार्कीग व्यावसायासाठी भाडेतत्वावर मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका नगररचना विभाग.

संदर्भ :- १. श्री. संतोष भोसले, रा. बुरूडगांव रोड, अहमदनगर यांचा दि.१८/०१/२०१६ रोजीचा अर्ज

२. मा.सभापती, स्थायी समिती यांचे दि.१९/१/२०१६ रोजीचे पत्र

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्र क्र.१ च्या अर्जान्वये, श्री. संतोष भोसले यंनी पार्किंग व्यवसायासाठी यश पॅलेस ते चाणक्याचौक रोडवरील आनंदऋषीजी हॉस्पीटल ते गुगळे बंगला माणिकनगर लगत असणारी रस्त्यापैकी जागा भाडेतत्वावर मिळणे बाबत मागणी केलेली आहे. संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये मा.सभापती स्थायी समिती यांनी सदर रस्त्यापैकी जागेत सध्या अनधिकृत गाडयांचे पार्किंग केले जाते. त्यामुळे पार्किगसाठी जागा देणेबाबत अटी / शर्ती टाकुन सदर जागा देणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर करणेबाबत कळविलेले आहे.

विषयंकित पार्किंग व्यवसायासाठी मागणी केलेली जागा ही मंजुर विकास योजनेतील व मंजूर नगररचना योजना क्र.३ मधील १८.२९ मी. रस्त्यापैकी व मंजूर रेखांकनातील ९.०० मी. रस्त्यापैकी आहे. सदर जागा रस्त्यापैकी असल्याने ती पार्किंग व्यवसायासाठी देता येणार नाही. असे मत आहे.

सबब उक्त नमुद बाब विचारात घेउन पुढील निर्णयासाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे सादर करणेबाबत निर्णयास्तव सादर.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त (कर)यांचा अभिप्राय की, प्रस्तावीतनुसार नगररचनाकार यांचे अभिप्रायान्वये आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, वाहने पार्कीग साठी वाहतुक शाखेशी समन्वय साधुन व जागा ठिकाणे निश्‍चित करून पे व पार्क तत्वावर चालविणेकामी धोरणात्मक निर्णय घेणे उचित होईल.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-यश पॅलेस ते चाणक्यचौक रोडवरील,आनंदऋषीजी हॉस्पीटल ते गुगळे बंगला माणिकनगर लगत असणारी रस्त्यापैकी जागा पार्कीग व्यावसायासाठी भाडेतत्वावर मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- पालिकेला उत्पन्न नको का?अनाधिकृत पार्किगवाले पैसे गोळा करतात.त्यावर कोणाचे नियंत्रण आहे का ?जर आपण पार्किग केली तर काय अडचण आहे.? आपण पुण्यामध्ये जातो तेथे रस्त्याच्या कडेला गाडी लावतो,त्याचे पैसे देतो,ती जागा तेथील पालिकेने ठेकेदारास पार्कीगकरीता कराराने दिली आहे. पुणे,मुंबईला रस्त्याचे कडेला असे पेड पार्किंग चालते, आपल्याला इनकम असे चालत नाही का?त्यामुळे गाडया नीट लावता येतील.

मा.दिप चव्हाण :- नगराचनाकार मत वाचा.

नगररचना विभाग श्री.जोशी :- मंजूर नगररचना योजनेप्रमाणे पार्कीग साठी जागा देता येत नाही.

मा.सभापती साहेब :- पुणे,मुंबई,औरंगाबाद येथील महानगरपालके मध्ये ठेकेदारा मार्फत अशा प्रकारे पार्किग च्या माध्यमातुन उत्पन्न कमावतात.आपल्याला उत्पन्न नको आहे का?

मा.श्री.सचिन जाधव :- रस्त्यावर भाजीवाले व इतर विक्रेते यांचेकडूनआपण रस्ताबाजू फी घेतो ना. अहमदनगर महानगरपालिकेची आर्थिक स्थीती बिकट झालेली असतांना अशा प्रकारच्या उत्पन्नाच्या स्त्रोत शोधले पाहिजे.तेथे जर अनिधिकृत प्रकारे पार्किग चे पैसे गोळा करत असतील तर आपण अधिकृत पार्किग करणेस काय हरकत आहे.

मा.सभापती साहेब :- जिथ उत्पन्नाचे स्त्रोत आहे तिथ लक्ष दयायला नको का

मा.श्री.दिप चव्हाण :- ज्या जागेमध्ये पार्किग करण्याचा प्रस्ताव आहे. त्या जागेची मालकी कोणाकडे आहे.म.न.पा.ची जागा आहे.तिथ काम करावयाचा अधिकार आपला आहे.आपल्याला दोन पैशाच उत्पन्न मिळत असेल तर आपल्याला नको आहे का ?ज्या ठिकाणी म.न.पा.ची जागा असेल तिथ पे अँण्ड पार्क पध्दतीने दया.नगरशहरा मध्ये अशा ज्या जागा असतील तिथे उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करा.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- आपण धोरण ठरवू शकतो.

मा.श्री.दिप चव्हाण :- आपण धोरणच ठरवत आहोत. फक्त हीच जागा असे नाही,तर शहरातील सर्व इतर जागांचा निर्णय घ्या.

मा.श्री.सचिन जाधव :- जिल्हा नियोजन समितीची बैठक लवकरच होणार असल्याने या समिती कडे अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विकास कामांचे ठराव करून पाठविण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- जाधव साहेब जे काम सांगतील ते करा.ठरावात घ्या.

मा.श्री.कुमार वाकळे :- पुणे,मुंबई,औरंगाबाद येथील महानगरपालके च्या धर्तीवर अर्जदार श्री. संतोष भोसले, रा. बुरूडगांव रोड, अहमदनगर यांना पार्किगसाठी अटी / शर्ती टाकुन सदर जागा ११वर्षांच्या मुदतीने देण्याची कार्यवाही करावी. तसेच इतर अशाच जागांचा शोध घेउन पार्कींग सुविधा करून द्यावी.

मा.श्रीमती मंगल गुंदेचा :- महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्न वाढीसाठी पार्किग साठी जागा देण्यात यावी.नवीन जागांमध्ये पार्कींग करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवावे.

मा.सभापती साहेब :- यश पॅलेस ते चाणक्यचौक रोडवरील,आनंदऋषीजी हॉस्पीटल ते गुगळे बंगला माणिकनगर लगत असणारी रस्त्यापैकी जागा पार्कींग व्यवसायासाठी भाडेतत्वावर अर्जदार श्री. संतोष भोसले यांना देणे करीता जागेची मोजमापे करून क्षेत्र निश्चिती करावी.तसेच करारनामा,अटी व शर्ती ,अनामत रक्कम,दरमहा जागा भाडे ,रस्त्याचे मोजमापे,वाहन पार्किग चे दर इ. या बाबत पुढील कार्यवाही करावी व पार्किग व्यावसाया करीता ११वर्षे करीता जागा भाडेतत्वावर देण्यात यावी.

**ठराव :-**अर्जदार श्री. संतोष भोसले यांना यश पॅलेस ते चाणक्यचौक रोडवरील,आनंदऋषीजी हॉस्पीटल ते गुगळे बंगला माणिकनगर लगत असणारी रस्त्यापैकी जागा पे व पार्क तत्वावर व्यवसायासाठी ११वर्षे मुदतीने भाडेतत्वावर देण्यास ही सभा मान्यता देत आहे.याकामी क्षेत्र निश्चिती करावी व करारनामा,अटी/ शर्ती ,अनामत रक्कम,दरमहा जागा भाडे, वाहन पार्किग चे दर इ. या बाबत पुढील कार्यवाही संबंधीत विभागांनी करावी. शहरातील इतर जागा पे व पार्क तत्वावर पार्किग चालविणे करीता देण्याबाबत कार्यवाही करावी. विषय मंजूर,
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

सही /-

अनुमोदक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका